# माती अन् पाणी वाचवण्यासाठी तरुणाईला आवाहन: 'रील फॉर सोईल अँड वॉटर कन्झर्व्हेशन' स्पर्धेचे आयोजन!




## विजेत्यांना मिळणार आकर्षक पारितोषिके!

स्पर्धेतील उत्कृष्ट रील्सना तज्ज्ञ परीक्षकांद्वारे आणि सोशल मीडियावरील प्रतिसादाच्या आधारे प्रोत्साहनपर रोख बक्षिसे दिली जातील.

प्रथम क्रमांक: ₹ २५,०००/- आणि गौरवचिन्ह

द्वितीय क्रमांक: ₹ १५,०००/- आणि गौरवचिन्ह

तृतीय क्रमांक: ₹ १०,०००/- आणि गौरवचिन्ह

याशिवाय, विजेत्यांना "युवा मृद-जलदूत" हा विशेष सन्मान देण्यात येईल, तर पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र देऊन गौरवले जाईल.

"एक Reel... मातीसाठी! एक Reel... पाण्यासाठी! एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी!" पर्यावरण रक्षण आणि जलसंधारणाची चळवळ आता मर्यादित स्वरूपात राहिली नसून डिजीटल विश्वातही तितक्याच ताकदीने पोहोचणार आहे.दि १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत साजऱ्या होत असलेल्या 'जलसंधारण सप्ताहा'चे औचित्य साधून, महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने राज्यातील तरुण-तरुणींसाठी 'रील फॉर सोईल अँड वॉटर कन्झर्व्हेशन' या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय रील स्पर्धेची घोषणा केली आहे. आजची तरुण पिढी सोशल मीडियावर कमालीची सक्रिय आहे. याच सर्जनशीलतेचा उपयोग करून माती व पाण्याचे महत्त्व सांगणारा संदेश घराघरांत पोहोचवणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

### स्पर्धेत भाग कोण घेऊ शकतं?

महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील सर्व युवक-युवती या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. राज्यभरातून १०,००० हून अधिक रील्स गोळा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्सचा सहभाग अपेक्षित आहे.

### कोणत्या विषयांवर रील बनवू शकता?

तुमच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी जल अन् मृद्संवर्धनाशी संबंधित अनेक विषय खुले ठेवण्यात आले आहेत. माती व पाणी संवर्धन आणि त्यांची बचत पावसाचे पाणी अडवणे व जिरवणे (Rainwater Harvesting) शेततळे, बंधारे आणि पाणलोट क्षेत्राचा विकास वृक्षारोपण, पर्यावरण रक्षण आणि मातीची धूप रोखणे, तुमच्या गावातील जलसंधारणाची यशस्वी उदाहरणे किंवा पारंपरिक पद्धती माती-पाणी वाचवणाऱ्या तुमच्या स्वतःच्या नाविन्यपूर्ण कल्पना रील कशी तयार करायची?

Instagram Reel ३० ते ६० सेकंदांची असावी. व्हिडिओच्या सुरुवातीला तुमचे संपूर्ण नाव आणि जिल्ह्याचे नाव सांगणे अनिवार्य असून रील तुमच्या स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करावी. रील पोस्ट करताना मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत अकाऊंटला टॅग करा आणि #Save-SoilSaveWater हा हॅशटॅग आवर्जून वापरावा.

### परीक्षणाचे निकष

लाईक्स किंवा फॉलोअर्सवर विजेता ठरवला जाणार नाही. विषयाची मांडणी (३० गुण), कल्पकता (२५ गुण), सामाजिक संदेश (२० गुण), सादरीकरणाचा दर्जा (१५ गुण) आणि प्रतिसाद (१० गुण) अशा एकूण १०० गुणांच्या आधारे निष्पक्ष पद्धतीने केले जाईल.

### आजच सहभाग घ्या!

आपल्या मातीचा सुगंध आणि पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्यासाठी तुमची कल्पकता वापरा. कॅमेरा उचला, एक छानशी रील बनवा आणि या राज्यस्तरीय चळवळीचा भाग बना!

**संकलन**

जिल्हा माहिती कार्यालय, अकोला

# भारताचे मातृरूप जनमानसात सुदृढ करणारे पहिले चित्र!

'राष्ट्र म्हणजे काय ? याविषयीचे जगभरातील विविध जनसमुहांची जाणीव भिन्नभिन्न असू शकते. भारतीय जनमानसाची जाणीव राष्ट्र, म्हणजे माता, अशी आहे. ही जाणीव स्वातंत्र्य काळात सुदृढ बनलेली आहे. ती तशी कशी बनली, याला अनेक कारणे आहेत. याचा एक घटक म्हणजे एक चित्र. शब्द बोध देतात, तर चित्र संवेदनशील मनाला बोधासह अधिक काहीतरी देते, हेही यातून स्पष्ट होईल. अशा एका चित्राविषयी आपण माहिती घेणार आहोत. हे चित्र समजून घेतांनाच आपल्याला मग लक्षात येईल की, 'भारत तेरे टुकडे होंगे' (भारत तुझे तुकडे होतील) किंवा 'हंस के लिया पाकिस्तान, छीन के लेंगे हिंदुस्थान' (हसून पाकिस्तान घेतला, हिंदुस्थान हिसकावून घेऊ), अशा प्रकारच्या घोषणांनी वा विचारांनी भारतीय जनमानस कुठे आणि कसे दुखावले जाते, हेही कळेल. 'राष्ट्र म्हणजे मातृदेवता', ही भारताच्या राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचे अविभाज्य अंग कसे आहे ?, याचा थोडा बोध व्हावा, यासाठी हा लेख...

### वर्ष १९०५ मध्ये काढलेले 'बंगमाते'चे चित्र

ब्रिटीश व्हॉईसराय लॉर्ड कर्झन याने १९ जुलै १९०५ या दिवशी बंगालच्या फाळणीचा निर्णय घोषित केला. संतापलेल्या भारतीय जनतेने आणि राष्ट्रीय नेत्यांनी या निर्णयाविरोधात देशव्यापी विरोध प्रदर्शन चालू केले. ब्रिटिशांवर आर्थिक दबाव आणण्यासाठी



कलकत्त्याच्या 'टाऊन हॉल'मध्ये ७ ऑगस्ट १९०५ या दिवशी झालेल्या सभेत 'स्वदेशी चळवळ आणि परदेशी मालाच्या बहिष्काराचा' ठराव संमत करण्यात आला. फाळणीविरोधी चळवळ स्वदेशी चळवळ बनून देशव्यापी बनली. एकसंध भारताची मूर्त प्रतिमा लोकांच्या मनात दृढ बनली. लोकांच्या मनात ही प्रतिमा रुजल्याने पुढच्या स्वातंत्र्य आंदोलनांना वेगळी झळाळी मिळाली.

### प्रतिमांचे अर्थ

प्रतिमेतून व्यक्त आशयाला नीट समजून घ्यावे. पुस्तक भारतीय संस्कृतीमधील ज्ञान दाखवते; भाताची कणसे अन्न, पाणी आदींची विपुलता दर्शवणारे, पांढऱ्या कापडाचा तुकडा समृद्धी दाखवतो, तर रुद्राक्षाची माळ आध्यात्मिकता दाखवते. या चित्रातून हिंदु देवतांच्या प्रतिमांची आठवण होते. त्यात अनेक हात, म्हणजे प्रचंड शक्तीचे प्रतीक. येथे माता तिच्या मुलांच्या माध्यमातून मुक्ती मिळवू पहात आहे, असे आहे. या प्रतिकांना आणखीही अर्थ आहे.'

**डॉ. दुर्गेश सामंत**, गोवा.

### देशाचे मातृरूप जनमानसात रुजणे

जनतेचा रोष प्रज्वलित होणे, त्याहीपेक्षा एकसंध भारताची प्रतिमा जनमानसाच्या हृदयात ठसवण्याचे काम एका गीताने केले. ते म्हणजे 'वन्दे मातरम्'. यासह भारतमाता ही संकल्पना लोकांच्या मनात स्थापित होण्याला आणखी एका गोष्टीमुळे मोठाच हातभार लागला. तो म्हणजे भारतमाता या चित्राचा !

### चित्राची जन्मकथा

अबनिंद्रनाथ टागोर (गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे भाचे) यांनी वर्ष १९०५ मध्ये रंगवलेल्या चित्राचे मूळ नाव बंगमाता होते. बंगालच्या फाळणीला विरोध म्हणून ते होते. हे चित्र बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी त्यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत वर्णन केलेल्या राष्ट्राच्या कल्पनेवर आधारित होते. त्यात भगवे वस्त्र परिधान केलेल्या आणि ४ हात असलेल्या साध्वीच्या एका हातात पुस्तक, दुसऱ्या हातात भाताची कणसे, तिसऱ्या हातात पांढऱ्या कापडाचा तुकडा आणि चौथ्या हातात रुद्राक्षांची माळ आहे. लेखात दिलेले चित्र नीट पहावे.

## जलसंधारण दिन विशेष

# जलसंधारण : जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा भक्कम पाया

पाणी म्हणजे शेतीचा श्वास आणि विकासाचा आधार आहे. बदलते हवामान आणि घटती भूजल पातळी यामुळे जलसंधारणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करून तो जमिनीत मुरवणे, ही काळाची गरज आहे. जलसंधारणातून मातीला नवजीवन, शेतीला आधार आणि भावी पिढ्यांना सुरक्षित भविष्य देण्याची ताकद आहे. महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून, त्यापैकी १७४.७३ लाख हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. राज्यातील २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकासासाठी पात्र असून, त्यापैकी १८२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर मृद व जलसंधारणाची विविध कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित क्षेत्रावरही नियोजनबद्ध पद्धतीने कामे सुरू आहेत. महाराष्ट्र शासनाने जलसंधारणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध प्रभावी योजना राबविल्या आहेत आणि राबवत आहे. राज्याला जलसुरक्षिततेच्या दिशेने सक्षमपणे पुढे नेण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग सातत्याने कार्यरत असून जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण, विकेंद्रित जलसाठ्यांची निर्मिती आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात आहे.

### जलयुक्त शिवारातून गावांच्या जलसमृद्धीकडे

जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये जलसाठे वाढले, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा झाली आणि संरक्षित सिंचनाला चालना मिळाली. ज्या शेतकऱ्यांना पूर्वी वर्षातून एकच पीक घेता येत होते, अशा अनेक भागांत दुबार पिकांच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जलसंधारणामुळे निर्माण होणारे संरक्षित सिंचन केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण बाजारपेठ, रोजगार, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांनाही चालना देते. जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यशानंतर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत राज्यातील ५,८५८ गावांमध्ये सुमारे १.४३ लाखांहून अधिक कामे प्रस्तावित झाली आहेत. त्यापैकी १.२४ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण झाली आहेत. जुलै २०२६ अखेर या अभियानावर २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे.

### गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार-पाण्यासोबत मातीलाही नवजीवन

'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' ही योजना पर्यावरण आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढते, तर तोच सुपीक गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होते. २०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३,३०५ जलाशयांमधून ९८०.५० लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, तो सुमारे १ लाख ९३ हजार एकर क्षेत्रावर पसरविण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, ८१,११४ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. म्हणजेच जलसंधारण हे शेतीला केवळ पाणी देत नाही, तर जमिनीलाही नवजीवन देते.

### भूजल पुनर्भरण-भविष्याच्या जलसुरक्षेची गुरुकिल्ली

भूजल पुनर्भरण हा जलसंधारणाचा अत्यंत महत्वाचा नैसर्गिक फायदा आहे. गेल्या काही दशकांत भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यामुळे अनेक भागांत विहिरी कोरड्या पडणे, बोअरवेलची खोली वाढणे आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा शेतीसोबतच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतो. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर भूजल संवर्धन आणि पुनर्भरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

### जलसंधारण म्हणजे पर्यावरणाचेही संवर्धन

जलसंधारणाचा पर्यावरणावरही अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. एखाद्या भागात पाणी टिकून राहिले, तर तेथील जैवविविधतेला आधार मिळतो. वृक्षसंवर्धनाला चालना मिळते, जमिनीतील ओलावा टिकतो आणि नैसर्गिक परिसंस्था मजबूत होण्यास मदत होते. अनेक ठिकाणी जलसंधारणाच्या कामांनंतर स्थानिक जैवविविधता आणि जलचरांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यामुळे जलसंधारण ही केवळ विकासाची योजना नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे.

### हवामान बदलाच्या आव्हानाला जलसंधारणाचे उत्तर

आज हवामान बदल हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी आणि त्यानंतर दीर्घ काळ पावसाचा खंड असे चित्र अनेक भागांत दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ मोठी धरणे किंवा पारंपरिक सिंचन व्यवस्था पुरेशी ठरणार नाही. गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. हवामान बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेचा विचार करून मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली आहे. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर दिला जात आहे.

**संजय राठोड , मंत्री, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र शासन**

### गुणवत्तापूर्ण कामे आणि कालबद्ध अंमलबजावणी

या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाची महत्वपूर्ण भूमिका आहे. विभागाच्या नव्या प्रशासकीय आकृतिबंधाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळाली आहे. मंजूर कामे मूळ आराखड्यानुसार आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण कामांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून, मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसंधारण अधिक परिणामकारक करण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

### प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर कामे

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये १४० प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या माध्यमातून सुमारे ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चालना देणारी विविध कामे सुरू आहेत. या योजनेचे एकूण प्रकल्पमूल्य १,२५१.११ कोटी रुपये असून, जुलै २०२६ अखेर सुमारे १,००३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन, सिमेंट बंधारे, पाणलोट विकास, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण आणि लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या जलसंवर्धन उपक्रमांची प्रभावी सांगड घालत महाराष्ट्र जलसुरक्षिततेच्या दिशेने भक्कम वाटचाल करत आहे. नाला खोलीकरणाबरोबरच बांबू लागवडीसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांवरही भर देण्यात आला आहे. विदर्भातील मालगुजारी तलावांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा दृष्टिकोन केवळ पाणी साठविण्यापुरता मर्यादित नसून जलस्रोतांचे दीर्घकालीन संवर्धन सुनिश्चित करणारा आहे.

### जलसंधारण दिनातून राज्यव्यापी लोकचळवळ

महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा महत्वाचा भाग म्हणून आज २१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांत 'महा वॉकेथॉन २०२६ — वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात आली आहे. "माती वाचवा , पाणी जपा , सुरक्षित भविष्य घडवा" हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे. सर्व जिल्ह्यांत ३ कि.मी. 'वॉक फॉर वॉटर' आणि सामूहिक मृद व जलसंधारण शपथ आयोजित करण्यात आली आहे. नागरिक, युवक, विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांना या उपक्रमातून जलसंधारणाच्या लोकचळवळीशी जोडण्याचा प्रयत्न आहे. युवकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देत त्यांना या लोकचळवळीशी डिजिटल माध्यमातून जोडण्यासाठी 'रील चॅलेंज' स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. माती संवर्धन, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या नाविन्यपूर्ण कल्पना समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

# नवीन कौशल्ये शिकण्याची तयारी हीच दुसऱ्या इनिंगची गुरुकिल्ली!

## आज जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन

२१ ऑगस्ट हा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. १९८८ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी हा दिवस घोषित केला. या दिवसाचा उद्देश ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा आणि समाजातील योगदानाचा सन्मान करणे हा आहे.

ज्येष्ठ नागरिक दिवस केवळ ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, त्यांच्या आरोग्याची काळजी किंवा त्यांच्या सुरक्षिततेची आठवण करून देणारा दिवस नाही. हा दिवस समाजाला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो, वय वाढले म्हणून माणसाची उपयुक्तता कमी होते का निश्चितच नाही. उलट अनुभव, ज्ञान, संयम, निर्णयक्षमता आणि जीवनाचा व्यापक दृष्टिकोन यामुळे ज्येष्ठ नागरिक समाजाची मोठी ताकद ठरू शकतात. आज आयुर्मान वाढले. वैद्यकीय सुविधा सुधारल्या, जीवनशैलीत बदल झाले. अनेक व्यक्ती साठीनंतरही शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्रिय राहू शकतात. त्यामुळे पारंपरिक अर्थाने 'निवृत्ती' ही संकल्पना नव्याने पाहण्याची वेळ आली आहे. नोकरीतून निवृत्त होता येऊ शकते; पण ज्ञानातून, अनुभवातून आणि समाजासाठी योगदान देण्यापासून निवृत्ती का घ्यावी आजच्या काळात ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे संतुलित आणि उत्पादक जीवन. आरोग्य, कुटुंब, आर्थिक स्थैर्य, सामाजिक संबंध, छंद आणि समाजासाठी योगदान यांचा योग्य समतोल साधणे आवश्यक आहे. केवळ आराम करणे म्हणजे आनंदी जीवन नव्हे. शरीराला हालचाल आणि मनाला सतत नवे आव्हान मिळाले, तर जीवन अधिक अर्थपूर्ण होते.

तंत्रज्ञानाने ज्येष्ठ नागरिकांसमोर संधींचे एक नवे जग उघडले आहे. पूर्वी संगणक, मोबाईल किंवा इंटरनेट हे तरुणांचे क्षेत्र मानले जात होते. आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल बँकिंग, ऑनलाईन शिक्षण, दूरस्थ काम, समाजमाध्यमे आणि आरोग्यविषयक डिजिटल साधने यांचा वापर ज्येष्ठ नागरिकही सहज करू शकतात. योग्य प्रशिक्षण मिळाले, तर वय हा तंत्रज्ञान स्वीकारण्यातील अडथळा राहत नाही. विशेषतः, कृत्रिम बुद्धिमत्ता ज्येष्ठांसाठी मोठी मदत ठरू शकते.

माहिती शोधणे, लेखन करणे, भाषांतर करणे, नवीन विषय समजून घेणे, जुन्या आठवणींचे दस्तऐवजीकरण करणे, व्याख्याने किंवा लेख तयार करणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे अशा अनेक कामांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करता येतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक केवळ तंत्रज्ञानाचे वापरकर्ते न राहता त्याचे सक्रिय सहभागी होऊ शकतात. ज्येष्ठांनी डिजिटल कौशल्ये आत्मसात केल्यास ते फायदेशीर ठरू शकते. स्मार्टफोन, संगणक, ई-मेल, व्हिडीओ बैठक, ऑनलाईन बँकिंग, डिजिटल पेमेंट आणि समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर यांचे ज्ञान महत्त्वाचे आहे. त्यासोबत कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाईन साधने आणि माहिती



शोधण्याची कौशल्ये आत्मसात केल्यास नव्या संधींचे दरवाजे उघडू शकतात.

याचबरोबर व्यावसायिक सातत्य ही संकल्पना महत्त्वाची ठरत आहे. प्रत्येक व्यक्तीने वयाच्या साठीनंतर पूर्णपणे काम थांबवले पाहिजे, असे आता आवश्यक नाही. कामाचे स्वरूप बदलता येते. पूर्णवेळ नोकरीऐवजी सल्लागार म्हणून काम करता येते. प्रशिक्षण देता येते, मार्गदर्शन करता येते, लेखन करता येते, अध्यापन करता येते, नवउद्योजकांना मदत करता येते किंवा स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करता येतो.

ज्येष्ठ नागरिकांकडे अनुभव असतो. व्यवस्थापन, उद्योग, शिक्षण, तंत्रज्ञान, प्रशासन, कला, शेती, व्यापार किंवा सामाजिक क्षेत्र, कोणत्याही क्षेत्रातील हा अनुभव पुढील पिढीसाठी अमूल्य असतो. आजच्या तरुणांकडे ऊर्जा आणि नवे तंत्रज्ञान आहे; ज्येष्ठांकडे अनुभव आणि शहाणपण आहे. या दोन्हींचा संगम झाला, तर समाजाची प्रगती अधिक वेगाने होऊ शकते. संवादकौशल्य, मार्गदर्शन कौशल्य, नेतृत्व, समस्या सोडविण्याची क्षमता आणि संघभावना ही कौशल्ये ज्येष्ठांच्या अनुभवाला मोठी ताकद देतात. अनेक वर्षांचा व्यावसायिक अनुभव तरुण उद्योजकांना मार्गदर्शन करण्यासाठी वापरता येतो. त्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करण्याचे प्रशिक्षण आणि आधुनिक व्यवसाय पद्धतींची ओळख उपयुक्त ठरेल. स्वयंरोजगार किंवा स्टार्टअपच्या दृष्टीने विक्री, विपणन, आर्थिक नियोजन, ग्राहकांशी संवाद, प्रकल्प व्यवस्थापन आणि ऑनलाईन व्यवसाय यांची मूलभूत माहितीही आवश्यक आहे. नवीन कौशल्ये शिकण्याची तयारी हीच या दुसऱ्या इनिंगची सर्वात मोठी गुरुकिल्ली आहे.

आज 'सेकंड इनिंग' ही कल्पना अधिक महत्त्वाची होत आहे. निवृत्तीनंतर एखाद्याने स्वतःला विचारावे, माझ्याकडे कोणते ज्ञान आहे? मी कोणाला शिकवू शकतो कोणत्या समस्येवर मी मार्गदर्शन करू शकतो माझ्या अनुभवाचा उपयोग समाजाला कसा होऊ शकतो या प्रश्नांची उत्तरे शोधली, तर निवृत्तीनंतरचे आयुष्य हे निष्क्रियतेचे नव्हे, तर नव्या संधींचे पर्व बनू शकते.

ज्येष्ठ नागरिकांनीही स्वतःला काळानुसार बदलणे आवश्यक आहे. 'आमच्या काळी असे नव्हते,' या मानसिकतेत अडकण्यापेक्षा 'आजच्या काळात काय नवीन आहे?' हा प्रश्न विचारणे अधिक उपयुक्त आहे. नवीन भाषा शिकणे, नवीन तंत्रज्ञान शिकणे, ऑनलाईन अभ्यासक्रम करणे, तरुणांशी संवाद साधणे, प्रवास करणे, लेखन करणे किंवा एखादा सामाजिक उपक्रम सुरू करणे, या सर्व गोष्टी मनाला तरुण ठेवतात. समाजानेही ज्येष्ठ नागरिकांकडे 'अवलंबून असलेला वर्ग' म्हणून पाहण्याची मानसिकता बदलली पाहिजे. अनेक ज्येष्ठ नागरिक आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या जागरूक आणि सामाजिकदृष्ट्या सक्रिय आहेत. त्यांच्यासाठी स्वयंसेवा, मार्गदर्शन, शिक्षण, उद्योजकता आणि ज्ञानवाटपाच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. विशेषतः, भारतासारख्या देशात ज्येष्ठ नागरिक हा मोठा मानवी भांडार आहे. त्यांच्या अनुभवाचा योग्य वापर झाला, तर शिक्षण, कौशल्य विकास, ग्रामीण विकास, सामाजिक सेवा आणि उद्योजकता या क्षेत्रांना मोठी मदत मिळू शकते. निवृत्त शिक्षक ग्रामीण विद्यार्थ्यांना शिकवू शकतात. निवृत्त अभियंते तरुण उद्योजकांना मार्गदर्शन करू शकतात. अनुभवी व्यवस्थापक नव्या उद्योगांना सल्ला देऊ शकतात. लेखक आणि तज्ज्ञ आपले ज्ञान डिजिटल माध्यमातून लाखो लोकांपर्यंत पोहोचवू शकतात.

ज्येष्ठ नागरिक दिन हा केवळ ज्येष्ठांचा सन्मान करण्याचा दिवस न राहता त्यांच्या नव्या भूमिकेचा संकल्प करण्याचा दिवस व्हावा. निवृत्ती म्हणजे शेवट नव्हे; ती आयुष्याच्या दुसऱ्या आणि कदाचित अधिक अर्थपूर्ण पर्वाची सुरुवात असू शकते. ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःला 'मी किती वर्षांचा आहे' यापेक्षा 'आजही मी किती लोकांसाठी उपयुक्त ठरू शकतो असे विचारायला हवे. ज्येष्ठ नागरिकांसाठी संदेश स्पष्ट आहे. वय हा आकडा आहे; उपयुक्तता ही वृत्ती आहे. शरीराला विश्रांती द्या; पण मनाला निवृत्त करू नका. अनुभव जतन करा; पण तो स्वतःपुरता ठेवू नका. तंत्रज्ञान स्वीकारा, तरुणांकडून शिका आणि तरुणांना तुमचा अनुभव द्या. मेंटॉरशिप प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अनुभवी ज्येष्ठ नागरिक आणि तरुण स्टार्टअप उद्योजकांना जोडता येईल. त्यामुळे ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची तंत्रज्ञानाची ऊर्जा एकत्र येऊन रोजगार, उद्योजकता आणि सामाजिक विकासाच्या नव्या संधी निर्माण करू शकतात.

## आरुष जवंजाळची तालुक्यात बाजी



**अकोट :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला असून, येथील आरूष प्रशांत जवंजाळ याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इंग्रजी माध्यमातून इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत आरूषने अकोट तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. आरूषच्या या यशामुळे अकोट तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

# मूर्तिजापुरात खड्ड्यांचे साम्राज्य; उत्सवापूर्वी रस्ते दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**मूर्तिजापूर :** शहरातील महाराजा हॉटेल ते पंचशील वाडी, पोळा चौक, मेनरोडसह विविध प्रमुख मार्गांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. आगामी धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर या मार्गांवर भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्सवापूर्वी शहरातील प्रमुख रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नगर परिषदचे माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद रामदासजी दुबे यांनी पालकमंत्री आकाश फुंडकर व जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराजा हॉटेल ते पंचशील वाडी, पोळा चौक व मेनरोड परिसरातील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, पावसामुळे त्यात पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. वर्मा सोनार यांच्या दुकानाजवळील दोन रस्त्यांची अवस्थाही अत्यंत खराब असून लोखंडी रॉड बाहेर आल्याने पादचारी व वाहनचालकांसाठी धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी यापूर्वी लहान-मोठे अपघात झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

रोशनपुरा येथील सलीम भाई यांच्या घराजवळ तसेच डॉ. इंगळे यांच्या पंचशील वाडी परिसरात नवीन रस्ते तयार करावेत. प्रभाग क्रमांक ६ मधील हनुमान मंदिराजवळील रस्त्याचीही तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी दुबे यांनी केली आहे. आगामी धार्मिक उत्सवाच्या काळात बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांची संख्या वाढणार असल्याने रस्त्यांची दुरवस्था गंभीर ठरू शकते. त्यामुळे प्रशासनाने खड्डे बुजविण्यासोबतच अत्यंत खराब मार्गांची तातडीने दुरुस्ती करून नागरिक व भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## न्यू तापडिया नगर येथे रस्ता दुरुस्ती आणि साफसफाईचे आ.रणधीर सावरकर यांचे निर्देश

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**अकोला :** न्यू तापडिया नगर भागातील नागरिकांच्या सोयीसाठी आमदार रणधीर सावरकर यांनी रेल्वे क्रॉसिंग ते चोपडे लेआउट पर्यंतच्या रस्त्याची पाहणी केली. या दरम्यान त्यांनी बांधकाम विभाग आणि महानगरपालिका प्रशासनाला रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याचे तसेच परिसरात साफसफाई करून योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

रेल्वे विभागाच्या तांत्रिक अडचणींमुळे उड्डाणपुलाच्या कामाला विलंब झाला आणि त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढली. त्यासाठी आमदार रणधीरभाऊ सावरकर यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यमंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्याकडून पुन्हा विशेष निधी उपलब्ध करून घेऊन कामाला गती दिली आहे.

हा उड्डाणपूल मध्य रेल्वे आणि दक्षिण मध्य रेल्वे या दोन रेल्वे लाईनवरून जाणार आहे. नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी विशेष भूमिगत रस्ता तयार करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. पाहणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रसाद पाटील, उप अभियंता राजेश राठोड, महापौर शारदाताई खेडकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, एड. देवाशिष काकड, रणजीत खेडकर, नगरसेवक प्रशांत जोशी, नगरसेविका नीतू जगताप, नगरसेविका शशिकला काळे, सागर शेगोकार, हरीश काळे, प्रवीण बोरकर, एड. प्रवीण भौरदकर, संदीप गावंडे, संदीप शेगोकार, राजेश वारोड, रवी यादव, उमेश श्रीवास्तव, प्रकाश रेड्डी, विवेक भरणे, गोल्डी, एड. आनंद रानडे, एड. गिरीश गोखले आदी पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

## अकोल्यात श्रावण महिन्यानिमित्त मातृशक्ती कावड-कलश यात्रा



प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अकोला :** शहरात विश्व मांगल्य सभा आणि महिला संघटनांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'मातृशक्ती कावड-कलश यात्रा' उत्साहात पार पडली. मोठ्या राम मंदिरापासून निघालेली ही यात्रा श्रीराजराजेश्वर मंदिरात पोहचली. श्रावण महिन्याचे औचित्य साधून अकोला शहरात भक्ती आणि संस्कृतीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. विश्व मांगल्य सभा आणि शहरातील विविध मातृशक्ती मंडळांच्या वतीने या भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. टिळक मार्गावरील मोठ्या राम मंदिरापासून गुरूवारी दुपारी २ वाजता या यात्रेला सुरुवात झाली. पारंपरिक केसरी वस्त्र परिधान केलेल्या शेकडो महिला हातामध्ये कलश आणि कावड घेऊन यात्रेत सहभागी झाल्या होत्या. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता.

## जातीय दंगा काबूची रंगीत तालीम; पोलिसांचा सज्जतेचा थरारक डेमो

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**मुर्तीजापुर :** फोटो शहरातील तोलाराम चौक परिसरात जातीय दंगा उद्भवल्यास परिस्थितीवर तातडीने नियंत्रण मिळविता यावे, तसेच पोलीस यंत्रणा, अग्निशमन दल व वैद्यकीय सेवांमध्ये समन्वय राहावा, या उद्देशाने जातीय दंगा काबूची रंगीत तालीम घेण्यात आली. या रंगीत तालीमेत पोलिसांनी प्रत्यक्ष दंगलसदृश परिस्थितीचा डेमो सादर करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम आयोजित करण्यात आली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या देखरेखीखाली तसेच मुर्तीजापुर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दंगल नियंत्रणाची विविध प्रात्यक्षिके सादर केली.

या रंगीत तालीमेत उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तीजापुर शहर व ग्रामीण, माना आणि बोरगाव पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. प्रोव्हिजनल उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद कांदे, मुर्तीजापुर ग्रामीणचे ठाणेदार महाडिक, माना पोलीस ठाण्याचे ठाणेदार नावकर, बोरगावचे प्रभारी ठाणेदार कैलास चौधरी, एपीआय राठोड, पीएसआय महाजन, तसेच मुर्तीजापुर डीबी पथकातील कर्मचारी आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. एकूण सुमारे ५५ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या सरावात सहभाग नोंदविला.

### दंगलसदृश परिस्थितीवर नियंत्रणाचा डेमो

रंगीत तालीमेदरम्यान अचानक निर्माण होणाऱ्या तणावपूर्ण परिस्थितीचा सामना कशा पद्धतीने करावा, जमावाला कसे नियंत्रित करावे, संवेदनशील परिस्थितीत पोलीस बंदोबस्त कसा लावावा, नागरिकांची सुरक्षितपणे सुटका कशी करावी, जखमींना तातडीने वैद्यकीय मदत कशी उपलब्ध करून द्यावी, याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत केवळ पोलीसच नव्हे, तर अन्य यंत्रणांमध्येही तातडीचा समन्वय आवश्यक असतो. याची प्रत्यक्ष चाचणी घेण्यासाठी रंगीत तालीमेत दोन रुग्णवाहिका तसेच मुर्तीजापुर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाचा सहभाग होता. त्यामुळे संभाव्य दंगल, आग किंवा दुखापतीच्या परिस्थितीत विविध विभागांनी एकत्रितपणे कशा पद्धतीने काम करावे, याचा सराव झाला. यावेळी ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांनी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

## अनुसूचित जाती कल्याण समितीच्या सदस्यांची भेट



प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समिती, सन २०२४–२५ चे समिती प्रमुख तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त आमदार नारायणभाऊ कुचे तसेच समिती सदस्य गजानन लवटे, संजय मेश्राम, जगन्नाथ अभ्यंकर आणि . डॉ. अशोक माने यांची अकोला येथील शासकीय विश्रामगृह येथे सदिच्छा भेट झाली. यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी समितीतील सर्व मान्यवर लोकप्रतिनिधींचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक स्वागत व सत्कार केला. सामाजिक न्याय, समता, संविधानिक मूल्ये तसेच अनुसूचित जाती आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या लोकप्रतिनिधींची ही भेट अत्यंत प्रेरणादायी असल्याचे आमदार पिंपळे यांनी यावेळी नमूद केले. या सदिच्छा भेटीदरम्यान सामाजिक न्यायाच्या विविध विषयांसह अनुसूचित जाती व वंचित घटकांच्या विकासासाठी आवश्यक

## भोपळे विद्यालयात गुणगौरव सोहळा साजरा



प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**हिवरखेड :** महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेच्या मार्गदर्शिका तथा ज्येष्ठ समाजसेविका स्व. कमलिनीताई सहदेवराव भोपळे यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी गुणगौरव पुरस्कार सोहळा सहदेवराव भोपळे विद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासोबतच सामाजिक बांधिलकीची परंपरा जपणारा हा सोहळा प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्याचे पूजन तसेच स्व. कमलिनीताई सहदेवराव भोपळे व सहदेवराव उपाख्य दादासाहेब भोपळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे होते. नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष प्रतिभा येऊल, महिला व बालकल्याण सभापती प्रमिला मानकर, नगरसेवक किरण सेदानी, नगरसेवक आझमभाई, देविदास फोपसे, संस्थेच्या संचालिका अन्नपूर्णाताई बंड, पोलीस पाटील प्रकाश गावंडे, चंद्रप्रकाश भोपळे, मुख्याध्यापक अरविंद गिऱ्हे, प्रा. विलास राऊत, योगशिक्षक नामदेव इंगळे, संस्थेचे पदाधिकारी, संचालक, आजीवन सदस्य, गावातील प्रतिष्ठित व दानशूर व्यक्ती, पालक, पत्रकार बांधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी दानशूर व्यक्तींनी ठेवलेल्या ठेवीतून शाळेतील इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच श्रीमती रतनबाई ताराचंदजी कानूंगा वरिष्ठ मराठी प्राथमिक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. 'स्व. कमलिनीताई भोपळे सुकन्या योजना' अंतर्गत गॅस शेगडी वितरण करण्यात आले. अनिलकुमार भोपळे यांनी स्व. कमलिनीताई भोपळे यांच्या कार्याचा आणि संस्कारांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम झाले पाहिजे. संस्थेचे कार्यवाह श्यामशील सहदेवराव भोपळे यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या उपस्थितीत अभिष्टचिंतन करण्यात आले. प्रास्ताविक संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. कौस्तुभ भोपळे यांनी केले. प्रतिभाताई येऊल व प्रमिलाताई मानकर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शंकर दुनघव व डॉ. मयूर लहाने यांनी केले, तर आभार प्राचार्य संतोषकुमार राऊत यांनी मानले.

## कसाईपुऱ्यात अवैध गोमांस व्यवसाय करणाऱ्या विरुद्ध कारवाई




**हिवरखेड :** अडगाव बु. येथे पोलिस पेट्रोलिंग करीत असताना पोलिसांना भीम नगरातील कसाईपुऱ्यात दोन इसम अवैध गोमांस व्यवसाय करीत असल्याचे पोलिसांना आढळून आले. घटनास्थळाहून अंदाजे ६५ किलो मांस, दोन लोखंडी कुऱ्हाड असा २२,६००, रुपयांचा माल जप्त केला.

आरोपी शेख अमीन शेख मुनाफ वय ( ३९ वर्षे रा कसाईपुरा ), नसीम अहमद शेख इस्माईल वय ३०, वर्षे रा. कसाईपुरा यांच्या विरुद्ध प्राणी सुरक्षा संरक्षण कायद्या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय गोपाल गिलबिले, पोलिस कर्मचारी, प्रवीण कुंजाम,विनोद खर्डे, योगेश इंगळे,रोशन ठाकूर, रोहन बोराडे, महिला शिपाई अश्विनी करवते यांनी केली.

## मागासवर्गीयांच्या विविध प्रश्नांवर अनुसूचित जाती कल्याण समितीकडे निवेदन

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**अकोला :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अकोला दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर मागासवर्गीय समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे समितीचे प्रमुख आमदार नारायण कुचे यांचे लक्ष वेधण्यात आले आहे. याबाबत राष्ट्रीय चर्मकार महासंघ संघटनेचे अकोला जिल्हाध्यक्ष प्रविण चोपडे यांनी निवेदन सादर करून विविध मागण्या केल्या.

मागासवर्गीयांच्या दृष्टिकोनातून उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे, चर्मकार समाजासाठी लिडकॉमअंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, तसेच अकोला जिल्ह्यातील गटई कामगारांना लोखंडी स्टॉल उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय मागासवर्गीयांच्या अनुशेषातील पदांची भरती करण्यास प्राधान्य द्यावे, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची (GOI) शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्षात नियमितपणे मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीचे अर्ज भरून घेतल्यानंतर दोन-तीन वर्षे रक्कम खात्यात जमा होत नसल्याच्या तक्रारी असून, या प्रकरणाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणीही करण्यात आली.

शिष्यवृत्ती प्रक्रियेत तांत्रिक अडचणी अथवा लिंक बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास दूर करून संबंधित विभागाच्या स्तरावर प्रभावी कार्यवाही करावी, तसेच महागाईचा विचार करून शिष्यवृत्तीचे दर वाढवावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शैक्षणिक सत्र संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा होईल, याची कटाक्षाने अंमलबजावणी करावी, अशीही मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघांचे जिल्हाध्यक्ष प्रविण चोपडे यांनी केली आहे. समितीने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.यावेळी प्रविण चोपडे, सुनील झेड गवई, किशोर काकडे,इंजिनिअर विजय आर गाडगे ओ बि सि सामाजिक कार्यकर्ते भास्करराव शिरभाते, प्रतिभा शिरभाते, लीना चिम, महिला जिल्हाध्यक्ष संजोती मांगे, वंदना कांबळे, वनिता सुनील गवई, मंगला प्रविण चोपडे, श्रीराम राखोंडे, रामभाऊ ताजने, पांडुरंग उत्तराजी वाडेकर व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते

## बोर्डी-रामापूर भागातील हिरव्यागार पराटी अज्ञात रोगाने जळून खाक; लाखोचे नुकसान

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**अकोट :** अकोट तालुक्यामधील रामापूर कासोद बोर्डी या शेत शिवारामध्ये गेल्या पंधरवड्यापासून उभारणीस फुलपाते व परिपक्व झालेल्या बोंड्या अशा मराटी च्या झाडावर अज्ञात रोगाने परिसरात थैमान घातला आहे त्यामुळे पराटी झाडे सुकण्याच्या मार्गावर लागलेले आहे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.

शेत शिवारामध्ये शेतकऱ्यांनी मे जून मध्ये पराटी व काही तुर पिकाची लागवड केली आहे बांधावरच्या या पिकावर अस्मानी संकटाने व्हायरस आल्याने हिरवेगार पिक हे होत्याचे नव्हते झाल्याने मराठी पूर्णता पाते पाने व बोंड गळण लागली आहे.

शेतकरी हजारो रुपये खर्च करून आज हवालदार झाला आहे या मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्यावर प्रशासनाने नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्याला राहिलेल्या हिरव्या पराटीवर तात्काळ उपाय योजना करण्याची औषध फवारणी उपलब्ध करून द्यावी व कृषी विभागाने या वाढत्या व्हायरस असमान आणि संकटाला ताबडतोब रोखण्यासाठी शेतकऱ्यांना न्याय द्यावा. यावेळी रामापुर येथील गजानन डाफे, प्रकाश आतकड, सुभाष सहारे, नंदकिशोर सोळंके प्रल्हाद बुंदे रामदास धुर्वे नारायण डुकरे रामहरी डाफे गजानन गायकवाड रुपेश गायकवाड गजानन कुचेकर अरुण कोल्हे राजेश इस्थापे सुरेश इस्थापे संजय गायकवाड सुनील आतकड पवन आतकड रोहन गये अमोल सोळंके इत्यादी शेतकऱ्यांची शेतकऱ्यांची शेतीतील पराठी पूर्णता वाढली आहे.

# प्लास्टिक बंदी कागदावर; संकलन केंद्रात प्लास्टिकचा डोंगर

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अकोट :** शहरात प्लास्टिक बंदीचा नियम कागदावरच राहिला आहे की काय, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे. शहरातील बाजारपेठेत प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर सुरू असतानाच दुसरीकडे नगरपरिषदेच्या कचरा संकलन व्यवस्थेतच मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जमा होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

उघड्यावर पडलेला कचरा असो किंवा संकलित करून ठेवलेला कचरा— प्लास्टिक सर्वत्र दिसत आहे. कचऱ्याच्या ढिगात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, पॅकिंग साहित्य, प्लास्टिकचे कप आणि विविध प्रकारचे प्लास्टिक अवशेष स्पष्टपणे दिसत आहेत. त्यामुळे प्लास्टिक बंदीच्या

## मग बंदी नेमकी कुणासाठी?



अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे शासन प्लास्टिकमुक्तीचा संदेश देते, जनजागृती केली जाते; तर दुसरीकडे शहरातून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा जमा होत आहे. प्लास्टिक वापरणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी नगरपरिषद प्लास्टिक जमा करण्यापुरतीच मर्यादित राहिली आहे का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### हितसंबंधांमुळे कारवाईला ब्रेक?

प्लास्टिकचा वापर खुलेआम सुरू असतानाही ठोस कारवाई होत नसेल, तर यामागे काही वेगळे हितसंबंध आहेत का? काही व्यापारी किंवा पुरवठादारांना अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. प्लास्टिक बाजारात येते, नागरिक वापरतात, कचऱ्यात जाते आणि नगरपरिषद तेच प्लास्टिक गोळा करते— मग बंदी नेमकी कुठे लागू आहे? हा प्रश्न उपस्थित होतो.

नगरपरिषद प्रशासनाने प्लास्टिक बंदीअंतर्गत आतापर्यंत किती कारवाया केल्या, किती दंड वसूल केला, किती प्लास्टिक जप्त केले आणि जप्त केलेल्या प्लास्टिकचे पुढे काय केले, याचा खुलासा करणे गरजेचे आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com




## माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळात महा वॉकेथॉनसाठी उसळला जनसागर

■ **यवतमाळ :** जलसंधारण दिनानिमित्त माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहरातील समता मैदान येथे आयोजित महा वॉकेथॉनमध्ये तब्बल २५ हजार नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ‘माती वाचवा, पाणी जपा, भविष्य सुरक्षित करा’ हा संदेश देत विद्यार्थी, युवक, महिला, शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांनी वॉकेथॉनमध्ये सहभाग घेतला. जलसंधारणाबाबत जनजागृती करणाऱ्या या उपक्रमासाठी समता मैदानावर सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या वॉकेथॉनमुळे यवतमाळात जलसंधारणाचा संदेश घुमला.

## ग्रामपंचायत अधिकारी मृत्यूप्रकरणी ग्रामसभांवर बहिष्कार

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**बाभुळगाव :** जळगाव जिल्ह्यातील शिवरे येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेचा बाभुळगाव तालुका ग्रामसेवक संघटनेने तीव्र निषेध केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ १८ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. याबाबतचे निवेदन गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांना देण्यात आला.

“ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामसेवक हे गावाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजना आणि सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. कर्तव्य बजावताना त्यांच्यावर हल्ले होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शिवरे येथील घटनेचा निषेध नोंदवून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे,” अशी मागणी संघटनेने निवेदनातून केली.

निवेदन देताना ग्रामपंचायत अधिकारी श्रीकांत जगताप, अतुल हांडे, विनोद गुल्हाणे, राहुल मानकर, चेतन ठाकरे, मनोज गेडाम, ओमप्रकाश कावलकर, माने आदी उपस्थित होते.

## ‘सापांचे संरक्षण करा, निसर्गाचे संरक्षण करा’चा संदेश



प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**महागाव :** येथील माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये नागपंचमीचा सण पर्यावरणपूरक आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्या मंजू जोशी यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सापांच्या विविध रंगीबेरंगी प्रतिकृती साकारल्या.

कार्यक्रमासाठी फुलसावंगी येथील श्री राधेकोचिंग क्लासेसच्या संचालिका सारिका गोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांसाठी सापांच्या प्रतिकृती तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकौशल्यातून आकर्षक प्रतिकृती तयार करून ‘सापांचे संरक्षण करा, निसर्गाचे संरक्षण करा’ हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

साप निसर्गचक्रातील महत्त्वाचा घटक असून तो मानवाचा मित्र आहे. शेतातील उंदरांसारख्या पिकांचे नुकसान करणाऱ्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवण्यात सापांची महत्त्वाची भूमिका असते.

त्यामुळे सापांविषयीचे गैरसमज दूर करून त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

“विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. शिक्षणासोबतच निसर्ग आणि प्राणिमात्रांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचे हे उत्तम उदाहरण आहे,” असे प्रमुख अतिथी सारिका गोरे यांनी सांगितले.

माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कौशल्यविकास आणि व्यावहारिक ज्ञानाला चालना देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. नागपंचमीचा हा उपक्रमही विद्यार्थ्यांना निसर्गाशी मैत्रीपूर्ण नाते जोडण्याची प्रेरणा देणारा ठरला.

## वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राचे अनावरण

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**आर्णी :** हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तालुक्यातील म्हासोला येथे मंगळवार, १८ तारीख रोजी त्यांच्या तैलचित्राचा अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. निवृत्त आयुक्त राजेश आडे यांच्या शुभहस्ते या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात वसंतराव नाईक यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या गौरवशाली कार्याला उजाळा देण्यात आला. कृषी क्षेत्राचा कायापालट करण्यासाठी, बळीराजाला सक्षम बनवण्यासाठी आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेल्या अभूतपूर्व योगदानाचे उपस्थितांनी कृतज्ञतापूर्वक स्मरण केले.

या कार्यक्रमाला निवृत्त आयुक्त राजेश आडे यांच्यासह म्हासोला येथील सरपंच मंदाताई भगत, उपसरपंच रवींद्र मालोदे, राजन भागवत, श्रावण नाईक, एस. डी. चव्हाण, जितेश राठोड, दीपक राठोड, बाबूलाल नाईक, संजय कोयरे आणि गोपाल गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यास म्हासोला आणि परिसरातील ग्रामस्थ, समाजबांधव तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी वसंतराव नाईक यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

## वरुडच्या लेकींचा तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात डंका!

### अनुष्का कांबळे अन् रक्षा जाधवची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**पुसद :** नवजीवन इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित तालुकास्तरीय अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात वरुड केंद्रातील विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर यश संपादन केले आहे. तालुक्यातील तब्बल ४४ नामांकित शाळांच्या चुरशीच्या स्पर्धेत वरुड केंद्रातील दोन विद्यार्थिनींनी बक्षीस पटकावून केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला.

स्पर्धेत कोषटवार महाविद्यालय, पुसद यांनी प्रथम, तर यशवंत महाविद्यालय, शेंबाळपिंपरी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या उच्च दर्जाच्या स्पर्धेत वरुड केंद्रातील अनु. जाती मुलींची शासकीय निवासी शाळा (आसरपेंड) येथील अनुष्का मिलिंद कांबळे हिने प्रोत्साहनपर बक्षीस मिळवून बाजी मारली. तिला मार्गदर्शक शिक्षिका अमृते यांचे मार्गदर्शन लाभले.

या मेळाव्यात संपूर्ण तालुक्यातून केवळ एकच जिल्हा परिषद शाळा सहभागी झाली होती. वरुड केंद्रातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा (मुंगशी) येथील रक्षा रमेश जाधव हिने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने विशेष प्रोत्साहनपर बक्षीस पटकावले. नामांकित शाळांच्या गर्दीत जिल्हा परिषदेच्या एकमेव शाळेने मारलेली ही धडक विशेष कौतुकास्पद ठरली. तिला वर्गशिक्षक समीर सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.

**अधिकारी अन् शिक्षणप्रेमींकडून कौतुकाचा वर्षाव :** या यशस्वी विद्यार्थिनींचा यवतमाळचे शिक्षणाधिकारी पागोरे, पुसदचे गटशिक्षणाधिकारी धीरज आडे, नेरचे गटशिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे , विस्तार अधिकारी अमित बोजेवार, गटसमन्वयक तथा विस्तार अधिकारी शितलकुमार वानखेडे , पीएम पोषण अधीक्षक अमर राठोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

विद्यार्थिनींच्या या यशामागे वरुड केंद्राचे केंद्रप्रमुख तथा केंद्र समन्वयक निलेश श्रृंगारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या चमकदार कामगिरीबद्दल वरुड केंद्रातील शिक्षक, मुख्याध्यापक, पालक व शिक्षणप्रेमींकडून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करावे

### लहुजी शक्ती सेनेचे केंद्रीय मंत्री आठवले यांना निवेदन

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**उमरखेड :** अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करून आरक्षणाचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचवावा, या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री ना. रामदास आठवले यांना निवेदन देण्यात आले.

२० ऑगस्ट रोजी स्थानिक राजस्थानी भवन येथे माजी आमदार नामदेवराव ससाने यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी दत्तात्रेय काळे, उत्तमराव काळे, जयकुमार बनसोडे, सोनू सोनटक्के, कैलास इंगोले, नागेश लांबटिळे, कपिल खंदारे, प्रशांत सूर्यवंशी, श्रीधर इंगोले, नितीन लांबटिळे, अवधूत इंगोले, विकी काळे, किरण लांबटिळे, शैलेश लांबटिळे, विशाल गायकवाड, अक्षय इंगोले आणि योगेश सूर्यवंशी उपस्थित होते.

## जखमी युवकाचाही उपचारादरम्यान मृत्यू

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**बाभुळगाव :** अंतरगावजवळ १८ ऑगस्ट रोजी झालेल्या चारचाकी व दुचाकीच्या भीषण अपघातातील गंभीर जखमी युवकाचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातात अनुष्का येरमे हिचा यापूर्वीच मृत्यू झाला होता. आता आर्यन धुर्वे याचाही मृत्यू झाल्याने अपघातातील मृतांचा आकडा दोन झाला आहे.

१८ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास बाभुळगावहून यवतमाळकडे जाणारी इको कार (एमएच २४ बीएल ४१४४) आणि यवतमाळकडून येणारी पल्सर दुचाकी (एमएच २९ सीके ८६३४) यांच्यात अंतरगावजवळ समोरासमोर धडक झाली. दुचाकीवर आर्यन धुर्वे व अनुष्का येरमे हे होते. कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले. अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. अनुष्काला बाभुळगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. तर आर्यनची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचाही मृत्यू झाला. याप्रकरणी अनुष्काचे वडील दिलीपराव येरमे यांच्या फिर्यादीवरून कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास बाभुळगाव पोलीस करीत आहेत.

## महागाव ग्रामीण रुग्णालयातील हल्ल्याचा तीव्र निषेध



प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**उमरखेड :** महागाव ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर, नर्सिंग अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांवर १८ ऑगस्ट रोजी रात्री झालेल्या हल्ल्याचा उमरखेड डॉक्टर असोसिएशनने तीव्र निषेध केला. दोषींवर कठोर कारवाई करून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, या मागणीचे निवेदन २० ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी अध्यक्ष डॉ. गजानन कोडगीरवार, उपाध्यक्ष डॉ. सुप्रिया नरवाडे, सचिव डॉ. प्रफुल भानेगावकर, कोषाध्यक्ष डॉ. पांडुरंग मुलगीर, डॉ. विवेक पत्रे, डॉ. अरुण बंग, डॉ. सुनील बंग, डॉ. श्रीराम रावते, डॉ. कुणाल काळे, डॉ. आशिष साखळे, डॉ. धनंजय व्यवहारे व डॉ. गजानन येलुरे यांच्यासह अनेक डॉक्टर उपस्थित होते.

## ग्रामपंचायत अधिकारी मृत्यूप्रकरणी ग्रामसभांवर बहिष्कार

### तालुका ग्रामसेवक संघटनेचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**बाभुळगाव :** जळगाव जिल्ह्यातील शिवरे येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेचा बाभुळगाव तालुका ग्रामसेवक संघटनेने तीव्र निषेध केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ १८ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. याबाबतचे निवेदन गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांना देण्यात आले.

जळगाव जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभा सुरू असताना काही व्यक्तींनी गोंधळ घालत ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शासकीय कर्तव्य बजावत असताना ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर झालेला हा हल्ला अत्यंत गंभीर व वेदनादायी असून, अशा घटनांमुळे ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

“ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामसेवक हे गावाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजना आणि सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. कर्तव्य बजावताना त्यांच्यावर हल्ले होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शिवरे येथील घटनेचा निषेध नोंदवून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे,” अशी मागणी संघटनेने निवेदनातून केली.

निवेदन देताना ग्रामपंचायत अधिकारी श्रीकांत जगताप, अतुल हांडे, विनोद गुल्हाणे, राहुल मानकर, चेतन ठाकरे, मनोज गेडाम, ओमप्रकाश कावलकर, माने आदी उपस्थित होते.

## नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याचा निषेध; उमरखेड येथे ‘जोडे मारो’ आंदोलन

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**उमरखेड :** मराठा समाजातील मुली व महिलांबाबत नवनाथ वाघमारे यांनी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ उमरखेड येथे सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी वाघमारे यांच्या छायाचित्राच्या बॅनरला चपलांची माळ घालून ‘जोडे मारो’ आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी घोषणाबाजी करत संबंधित वक्तव्याचा निषेध नोंदविला.

या वक्तव्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या असून, प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश सहसचिव सरोज देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेत, “मुलींबद्दल बोलताना जिभेवर लगाम ठेवा. महिलांच्या सन्मानाशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही,” असा इशारा दिला. जिजाऊच्या संस्कारात वाढलेल्या लेकी माता-भगिनींचा अपमान कदापि सहन करणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महिलांचा सन्मान हा केवळ एका समाजाचा नव्हे, तर संपूर्ण समाजाचा प्रश्न असल्याचे उपस्थितांनी सांगितले. महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

आंदोलनात सागर शिंदे, उषा खंदारे, रंजना माने, ललिता खंदारे, सुनीता देवसरकर, सुनीता ठाकरे, दिनेश रावते, अरुण ठाकरे, सुभाषराव देवसरकर, शुभम माने, गुलाब गजबे यांच्यासह महिला व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बचत गटांच्या माध्यमातून महिलांमध्ये वित्तीय साक्षरता- आ. सुलभा खोडके

## सिद्धी विनायक महिला बचतगट सहकारी पतसंस्थेची २४ वी आमसभा थाटात

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती:** बचत गटांमुळे महिला सक्षम बनत असून त्यांच्यामध्ये वित्तीय साक्षरताही वाढत आहे. बचत गटांच्या माध्यमातून आत्मनिर्भर होण्यासाठी महिला पुढाकार घेत आहेत. महिला बचत गटांना स्वयंपूर्ण बनवून त्यांना सहज भांडवल उपलब्ध व्हावे यासाठी अमरावती जिल्हा सिद्धी विनायक महिला बचतगट सहकारी पतसंस्था अग्रणी व कटिबद्ध असल्याचा विश्वास पतसंस्थेच्या अध्यक्ष आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केला.

गाडगे नगर स्थित संत गाडगे बाबा मंगलधाम सभागृहात आज गुरुवार दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती जिल्हा सिद्धी विनायक महिला बचतगट सहकारी पतसंस्था मर्यादित, अमरावती ची २४ वी वार्षिक आमसभा मोठ्या थाटात संपन्न झाली. पतसंस्था अध्यक्ष-




आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या वार्षिक आमसभेत व्यासपीठावर पतसंस्थेच्या संचालक-स्नेहा रायटे, छबुताई मातकर, सुचिता काळे,उषा पाटील,माधुरी भणग,वर्षा कुऱ्हेकर,सरोज चिखलकर, पूर्णिमा फंदे, पतसंस्थेच्या व्यवस्थापक-श्रीमती निलभाताई ठाकरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले कि, महिला सशक्तीकरणाच्या संकल्पनेत समानता व सर्वांगीण विकासाच्या संधी निर्माण करून महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे. यासाठी महिलांनी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी शोधात असतांना, गृह उद्योग सुरु करत असतांना व्यवसाय, व्यापार,बँकिंग आणि वित्त,विक्री आणि विपणन , संवाद कौशल्य, यासारखे कौशल्य आत्मसात करणे सुद्धा आवश्यक आहे. महिला बचत गटांना आर्थिक विकासाकडे वाटचाल करीत असतांना त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करून व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा सुद्धा आमचा प्रयत्न असून आज आमसभेनंतर आयोजित महिला भजन स्पर्धा त्याचा परिपाक असल्याचे प्रतिपादन सुद्धा आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी केले.तत्पूर्वी सर्वप्रथम आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते सिद्धिविनायक व महालक्ष्मी प्रतिमापूजन- वंदन-माल्यार्पण व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी आमसभेच्या कामकाजा दरम्यान अनुराधा बरडे यांनी संस्थेच्या वर्ष २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. तर व्यवस्थापक-निलभाताई ठाकरे यांनी मागील वार्षिक आमसभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे याबाबत सभासदांना यावेळी प्रोसिडिंग वाचन करून अवगत केले. तसेच संस्थेची आर्थिक पत्रके मंजुरी करणे याचे वाचन करणे, नफ्याचे विनियोजन ,बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणेबाबतचे वाचन सुद्धा कामकाजादरम्यान करण्यात आले.

# संस्कृतीचे जतन करून अमरावती शहरात भव्य कॅमेरा दिंडी उत्साहात साजरी

## अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशन, अमरावती

प्रतिनिधी २१ ऑगस्ट



**अमरावती** : जागतिक छायाचित्र दिनानिमित्त अमरावती शहरात दरवर्षी प्रमाणे यंदाही भव्य कॅमेरा दिंडी काढण्यात आली हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या ठिकाणी सर्व फोटोग्राफर बंधू भगिनी सहभागी होण्यासाठी एकत्र आले, यावेळी पालखीत ठेवलेल्या कॅमेराचे पुजन करण्यात आले. पुजण करण्यासाठी व दिंडीत सहभागी होण्यासाठी प्रिती बंड शिवसेना उपनेत्या शिंदे गट, मिलिंद बाबल नगरसेवक, ऋषिकेश देशमुख नगरसेवक, यश खोडके अध्यक्ष शोध प्रतिष्ठान अमरावती

आशिष धर्माळे शिवसेना जिल्हाप्रमुख शिंदे गट, राहुल मेश्राम वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष, अजय जगताप अध्यक्ष,गजानन महाराज संस्थान विवेकानंद कॉलनी अम

तसेच अंबानगरी चे अध्यक्ष गजानन अंबाडकर, सचिव प्रशांत टाके, सप्ताह प्रमुख हेमंत श्रीवास्तव, प्रकल्प प्रमुख सागर काजळे, आकाश देशमुख, संजय वाडकर, प्रशांत गजभिये, प्रशांत टाके,राज रंगारकर, विनोद ढवळे, निखिल तिवारी,सोहेल अहमद, अक्षय डोईफोडे, प्रतिक रोहणकर, यांनी कॅमेरा दिंडी ची पुर्ण जबाबदारी पार पाडली यावेळी उपस्थित अंबानगरी चे माजी अध्यक्ष, जेष्ठ सदस्य, व संपूर्ण सदस्य व अमरावती जिल्ह्यातील व जिल्हा बाहेर छायाचित्रकार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कॅमेरा दिंडीमध्ये बेलोरा येथील वारकरी दिंडी, सावंगा विठोबा येथील अवधुती भजन मंडळी,

पालखीमध्ये जुने कॅमेरा ठेवून कॅमेरा दिंडी काढण्यात आली उसात जल्लोषात ही कॅमेरा दिंडी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रवेशद्वारा जळून निघाली गांधी चौक राजकमल चौक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोप झाला.

गांधीजींच्या पुतळ्यांना हार अर्पण करण्यात आले तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला हरा अर्पन करण्यात आले. राजकमल चौकात फुलाचा वर्षाव करण्यात आला व त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वारकऱ्यांचे प्रात्यक्षिक तसेच उपस्थित फोटोग्राफर बंधू भगिनी यांच्या परिवारातील सदस्यांनी फुगडी खेळून नृत्य करून आनंद लुटला कॅमेरा दिंडी सुरूवात 2012 पासून अमरावती शहरात करण्यात आली. अमरावतीनंतर महाराष्ट्रात इतर ठिकाणी कॅमेरा दिंडीला सुरुवात झाली आता मोठ्या प्रमाणात ही कॅमेरा दिंडी महाराष्ट्रभर रुजू लागली त्याचा या अंबानगरी फोटोग्राफर असोसिएशनला अभिमान वाटतो.

# चोरीचा गुन्हा तत्काळ उघड करून मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती:** राजापेठ पोलीसांनी चोरीचा गुन्हा तत्काळ उघड करून माल हस्तगत केला.

पोलीस स्टेशन राजापेठ येथे दिनांक 20.08.2026 रोजी फिर्यादी सौ. प्रमीला सुरेश गुप्ता रा. नंदा मार्केट, दस्तुर नगर रोड, अमरावती यांनी तकार दिली की, फिर्यादी यांचे घराला लागुन गुप्ता किराणा दुकाण आहे. दिनांक 20.07.2026 रोजी 7 वा. सुमारास कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचे बाहेर ठेवलेले तिन स्वस्तीक कंपनीचे सोयाबीन तेलाचे पिपे कि. अं



7440 रूपयांचे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून पो. स्टे ला अपराध कमांक 759/2026 कलम 303 (2) भान्यासं अन्वये दाखल आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये गुप्त बातमीदारा कडुन मिळालेल्या बातमीच्या आधारे एका विधीसंघर्शीत बालकाला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरच्या घटनास्थळी चोरी केल्याची माहीती दिल्याने त्याचे कडुन गुन्हयामध्ये गेलेले तिन स्वस्तीक कंपनीचे सोयाबीन तेलाचे पिपे कि. अं 7440 रूपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि 2. संजय खताळे, सहायक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, काईम पोनी उमेश मुंडे, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोहेकॉ शशी शेळके, पोकॉ अमोल खंडेजोड, पोकों आबीद शेख, पोकॉ अंकुश काळे, पोकॉ प्रशांत बेलोरकर, पोका अर्जुन कदम, पोकॉ आकाश यादव, पोकों रफीक खान, पोकों सतीश टपके, यांनी केली.

# अमरावतीत महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचा जिल्हा कार्यकर्ता मेळावा उत्साहात

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती** : महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, अमरावती जिल्ह्याच्या वतीने आयोजित जिल्हा कार्यकर्ता मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात व समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीत संपन्न झाला. अमरावती शहरासह जिल्ह्यातील विविध तालुके, शहरे व गावांमधून समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अमरावती शहरातून भव्य रॅलीचे आयोजन करण्याबाबत मेळाव्यात



सविस्तर चर्चा करण्यात आली. रॅलीमध्ये समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती असावी, यासाठी नियोजन व पूर्वतयारी करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच महासभेच्या आगामी वार्षिक नियोजनाबाबत ईशान राजगुरे यांनी उपस्थित समाजबांधवांना सविस्तर माहिती दिली.

यावेळी उपस्थित समाजबांधवांनी समाजाच्या विविध प्रश्नांवर आपले परखड विचार मांडले. अमरावती जिल्ह्यातील तैलिक समाज संघटनात्मकदृष्ट्या अधिक सक्षम आणि राष्ट्रीय स्तरावर प्रभावी कसा होईल, याबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली. प्रत्येक तालुक्यातून प्रतिनिधी उपस्थित असल्याने मेळाव्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. विशेष म्हणजे महिला भगिनींचीही मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

### सभासद नोंदणीचे आवाहन

महाराष्ट्रातील तैलिक समाजाची सर्वात मोठी संघटना म्हणून महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेला अधिक बळकटी देण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने सक्रिय सभासद व्हावे. तसेच आपल्या कुटुंबातील, मित्रपरिवारातील व समाजातील जास्तीत जास्त बांधवांना सभासद करून संघटना अधिक मजबूत करावी, असे आवाहन करण्यात आले.

# आज 'महा वॉकेथॉन'चे आयोजन; नागरिकांना सहभागी होण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

## सहभागासाठी ऑनलाइन नोंदणी

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती:** जनसामान्यांपर्यंत जलसंधारणाचे महत्त्व पोहोचविण्यासाठी अमरावती शहरात आज 21 ऑगस्ट रोजी सकाळी 6 वाजता 'महा वॉकेथॉन : 'वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. क्युआर कोड व अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करून नागरिकांना सहभागी होता येणार आहे. जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश वॉकेथॉनद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय व मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने 'एक पाऊल जलसंधारणासाठी, एक पाऊल शाश्वत भविष्यासाठी'हा संदेश सर्वदूर पोचविण्यासाठी शनिवारी सकाळी 6 वाजता या 'महा वॉकेथॉन : 'वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकेथॉनला श्री.शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयापासून सुरुवात होणार आहे. पुढे गर्ल्स हायस्कुल चौक, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सिंचन भवन असा मार्गे शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथेच वॉकेथॉनचा समारोप होणार आहे. या उपक्रमात नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि जलसंवर्धन क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत जलसंधारणाच्या लोकचळवळीला बळ देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ऑनलाईन नोंदणी

नागरिकांनी महा वॉकॅथॉन - वॉक फॉर वॉटरमध्ये सहभागी होण्यासाठी दिलेल्या क्युआर कोडद्वारे किंवा https://register.mahaevent.co.in/ या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे.

# बांधकाम विभागातील कामांना गती देण्याचे आयुक्तांचे निर्देश

## प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावण्यावर भर

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती:** महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी मंगळवारी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी शहरात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांच्या अंदाजपत्रकासोबत आवश्यक माहिती आणि कागदपत्रे सादर करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट व काटेकोर निर्देश दिले.



प्रस्तावित विकासकामांचे अंदाजपत्रक सादर करताना केवळ कामाचा खर्च अथवा तांत्रिक बाबी नमूद न करता त्या कामाची आवश्यकता, सद्यस्थिती आणि प्रत्यक्ष स्थळाची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी, असे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सांगितले. यामुळे प्रस्तावित कामाची गरज, त्याची उपयुक्तता आणि प्रत्यक्ष परिस्थिती याबाबत प्रशासनाला योग्य निर्णय घेणे सुलभ होणार आहे.

अंदाजपत्रकात कामाचे नाव व कारण स्पष्ट असावे प्रस्तावित करण्यात येणाऱ्या प्रत्येक विकासकामाच्या अंदाजपत्रकात कामाचे नाव आणि काम प्रस्तावित करण्याचे कारण स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केव्हा करण्यात आले, याची स्थळ निरीक्षणाची तारीख व वेळ देखील अंदाजपत्रकासोबत नमूद करावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले. स्थळ निरीक्षणानंतर प्रस्तावित कामाची सद्यस्थिती दर्शविणारे GPS फोटोग्राफ्स अंदाजपत्रकासोबत जोडण्यात आले आहेत किंवा नाहीत, याची खात्री करावी. प्रत्यक्ष स्थळाची परिस्थिती छायाचित्रांच्या माध्यमातून स्पष्ट होणे आवश्यक असून, यामुळे कामाची आवश्यकता आणि प्रस्तावित स्वरूप याबाबत अधिक पारदर्शकता राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कामाचा प्रकार आणि पूर्वीच्या कामाची माहिती आवश्यक

प्रस्तावित विकासकामाचा कामाचा प्रकार तसेच प्रस्तावित कामाचा प्रकार अंदाजपत्रकात स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

# पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियाना' अंतर्गत रॅली व प्रतिज्ञा ग्रहण

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती:** भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या (Ministry of Social Justice and Empowerment) 'नशामुक्त भारत अभियान' आणि ब्रह्माकुमारीज मेडिकल विंग यांच्या संयुक्त विद्यमाने देशभरात राबविल्या जाणाऱ्या "नशामुक्त युवा – विकसित भारत" या देशव्यापी मोहिमेंतर्गत, १८ ऑगस्ट रोजी पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस (आयुर्वेद), अमरावती येथे नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

देशातील तरुण पिढीला व्यसनांच्या विळख्यातून मुक्त करून सुदृढ, निरोगी व सक्षम भारत घडविण्याच्या उद्देशाने आणि मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या "नशामुक्त भारत" संकल्पाला प्रतिसाद




देत महाविद्यालयाच्या वतीने एका भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवण्यात आला.

याप्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमात "Say No to Drugs, Say Yes to Life" चा संकल्प करत महाविद्यालयातील १८० विद्यार्थी आणि १०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची सामूहिक प्रतिज्ञा (National Pledge Against Drug Abuse) घेतली.

हा संपूर्ण उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व संयोजन नशामुक्ती अभियानाचे नोडल ऑफिसर तथा स्वस्थवृत्त व योगा विभाग प्रमुख डॉ. मनोदय मोहोड व डॉ. निकिता लांडे यांनी केले. या मोहिमेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, डॉक्टर्स, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सक्रिय सहभागी झाले होते.

# सद्भावना दिनानिमित्त आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांची प्रतिज्ञा

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती:** सद्भावना दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सद्भावना प्रतिज्ञा घेतली. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली. जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा यावरून कोणताही भेदभाव न करता सर्व भारतीय जनतेमध्ये भावनिक ऐक्य व



सामंजस्याची भावना वृद्धिंगत करण्यासाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच समाजातील विविध मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता विचारविनिमयाच्या माध्यमातून आणि संविधानिक मार्गाने सोडविण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली. देशाची एकता, अखंडता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. सद्भावना, शांतता, परस्पर आदर आणि बंधुभावाच्या माध्यमातून समाजात एकोपा निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

# कृषी पर्यटन केंद्र संचालकांची "मामाचं वावर" येथे कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती** : पर्यटन संचालनालय प्रादेशिक, अमरावती अंतर्गत अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांसाठी १८ ऑगस्ट २०२६ रोजी "मामाचं वावर" कृषी पर्यटन केंद्र, मौजे वळती, ता. चिखली, जि. बुलढाणा येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील विविध जिल्ह्यांतून आलेले कृषी पर्यटन केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक विजय जाधव, शाश्वत विकास केंद्र (अमरावती) चे गणेश चौधरी, कृषी पर्यटन केंद्र संचालक समिती (महाराष्ट्र राज्य) चे अध्यक्ष लहू अवताडे आणि कॅनव्हास फाउंडेशन, द चॅरिटेबल ट्रस्ट (अमरावती) चे आशिष शेरेकर उपस्थित होते.

या कार्यशाळेत उपसंचालक विजय जाधव यांनी महाराष्ट्राचे पर्यटन धोरण २०२४ अंतर्गत कृषी पर्यटन, साहसी पर्यटन, प्रोत्साहन, होमस्टे, पर्यटन व्हिला, व्हॅकेशन होम अशा अधिकृत नोंदणी प्रक्रिया आणि कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास कसा साधता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आजच्या डिजिटल युगात ए.आय चा वापर कसा करता येईल यावरही त्यांनी प्रकाश टाकला. गणेश चौधरी यांनी कृषी पर्यटन केंद्र चालवताना निसर्गाचा समतोल राखून शाश्वत विकासाची कास कशी धरावी आणि स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याबद्दल तांत्रिक व व्यावहारिक माहिती दिली.

अध्यक्ष लहू अवताडे यांनी राज्यातील कृषी पर्यटनासमोरील आव्हाने, संचालकांचे संघटन आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोन कसा असावा, यावर आपले अनुभव अभ्यासपूर्ण रितीने मांडले. तसेच शाळेच्या सहली व शासनाच्या विविध विभागांशी कसा समन्वय साधता येईल यावर मार्गदर्शन केले.याप्रसंगी अमरावती विभागातील विजय श्रीराव (महेंद्री कृषी पर्यटन केंद्र, वरुड), सुनील वारे (वनश्री कृषी पर्यटन केंद्र, उदखेड) तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील मातोश्री कृषी पर्यटन केंद्र (अंबड) आणि श्री गोकुळ कृषी पर्यटन केंद्र (जालना) येथील संचालकांनी आपले अनुभव सांगितले. या एक दिवसीय कार्यशाळेमुळे अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांना केंद्राचा दर्जा उंचावण्यासाठी नवीन नियमावली समजून घेण्यास व नवनवीन संकल्पना राबवण्यास मोठी दिशा मिळाली आहे. "मामाचं वावर" चे संचालक मोहन तेजराव जगताप यांच्या सहकार्याने सर्व संचालकांनी निसर्गरम्य वातावरणात वनभोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'पर्यटन मित्र' शिवाजी गायकवाड यांनी केले, तर प्रादेशिक कार्यालय अमरावतीचे उपलेखापाल राजेश मोहिते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# 20 दिवसांपासून पावसाची दडी

## खरीप हंगामातील पिके सुकण्याच्या मार्गावर! शेतकरी चिंतितः उत्पादनात घट होण्याची भीती!

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** पावसाने पुन्हा एकदा पाठ फिरवल्याने शेतकरी चिंतित सापडले आहेत. गेल्या तब्बल १७ दिवसांपासून तालुक्यासह जिल्ह्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर संकटाचे ढग दाटले आहेत. पावसाअभावी जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून, सोयाबीन, कपाशीसह इतर खरीप पिकांची वाढ खुंटत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. अनेक ठिकाणी



पिके सुकण्यास सुरुवात झाली असून, शेतकऱ्यांसमोर उत्पादन घटण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीपासूनच पावसाची अनियमितता कायम आहे. पेरणीनंतर पिके उगवणीच्या अवस्थेत असताना पावसाने तब्बल १२ दिवसांची दडी मारली होती. त्यानंतर झालेल्या पावसामुळे पिकांना काहीसा दिलासा मिळाला आणि शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या; मात्र ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसानंतर पुन्हा पावसाने विश्रांती घेतली.कोरडवाहू शेतीसमोर पावसाअभावी मोठे आव्हान खामगाव तालुक्यातील बहुतांश शेतीक्षेत्र कोरडवाहू असल्याने पावसाच्या खंडाचा थेट परिणाम पिकांवर होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतातील ओलावा कमी झाला असून सोयाबीन, कपाशीसह इतर खरीप पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी लवकरात लवकर चांगला पाऊस होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

» तालुक्यातील सोयाबीन व कपाशी पिकांवर पावसाच्या खंडाचा परिणाम दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी पिकांची नियमित पाहणी करून उपलब्ध सिंचन साधनांद्वारे संरक्षक पाणी द्यावे. पिकांवर ताण वाढल्यास कृषी विभागाशी संपर्क साधून तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार उपाययोजना कराव्यात. पिकांची अवस्था लक्षात घेऊन वेळीच उपाय केल्यास उत्पादनातील संभाव्य घट टाळण्यास मदत होईल.
**सुनील पवार,** तालुका कृषी अधिकारी

# मातंग समाजात शैक्षणिक क्रांतीच्या मशालीची ज्योत घरा-घरात पेटवू...

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**मलकापुर :** आरक्षण उपवर्गीकरण चा लढा-लढत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेवुन मातंग समाजात शैक्षणिक क्रांतीच्या मशालीची ज्योत घरा - घरात पेटवत मुला/ मुलींना उच्च शिक्षणासाठी बाध्य करु असे प्रतिपादन शिवसेनेच्या शिव लहुसेना संघटना जिल्हाध्यक्ष निवृत्ती तांबे यांनी मौजे हरसोडा ता. मलकापूर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलतांना केले , दिनांक १४ ऑगष्ट रोजी मौजे हरसोडा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सोशल फोरम चे वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते,

या प्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून निवृत्ती तांबे बोलत होते पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की आता या पुढील अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करतांना मातंग समाजातील उच्च शिक्षित तथा पदवीधारक मुला/ मुलींचे संमेलन आयोजित करण्यात येईल असा निर्धार ही त्यांनी या वेळी बोलतांना केला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शासनाचा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त मातंग समाजाचे जेष्ठ नेते विजय पारेकर हे होते तर प्रमुख उपस्थितीत हरसोडा सरपंच निवृत्ती तायडे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सोशल फोरम चे पदाधिकारी तथा कार्यक्रमाचे आयोजक तुकाराम कसारे, व तालुका अध्यक्ष गणेश क्षिरसागर, स्वाभिमानी मातंग संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल सुरळकर, ब्रास बँड संघटना तालुका अध्यक्ष नाना बोरले, गोविंदा वानखेडे ,,कडु सोनोने, विजय सोनोने, दयाराम सोनोने , समाधान सावळे,प्रविण अंभोरे व हरसोडा येथील भारत झाल्टे, सुखदेव मोरे, प्रल्हाद झाल्टे, गोविंदा कहाते, महादेव झाल्टे, अँड गोपाल रायपुरे, माजी उपसरपंच अनंत झाल्टे ,पांडुरंग देवकर रघुनाथ झाल्टे, शंकर धांडे ज्ञानेश्वर कहाते ,अमोल धाडे मंगल झाल्टे ,फरदिन शेख,रोशन झाल्टे, गुणवंत झाल्टे ,बाळा रायपुरे, सुनील कहाते ,अतुल कराळे ,शेख अहमद ,पुंडलिक मोरे ,तुळशीराम झाल्टे ,संजय मोरे , आदी मान्यवर उपस्थित होते.यासह आत्माराम कसारे, बळीराम कसारे ,मोतीराम कसारे ,काशीराम कसारे रूपचंद चंदनशिव ,संतोष कसारे ,चिंदाजी सोनवणे एकनाथ आव्हाड ,सिताराम कसारे, रमेश निकाळजे ,जगदेव वाघमारे ,गणेश कसारे, सागर कसारे ,श्रावण सोनवणे आदी. उपस्थित होते, यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच निवृत्ती तायडे यांनी केले तर विजय पारेकर अध्यक्षीय व सुनिल कहाते यांनी मनोगत व्यक्त केले व कार्यक्रमाचे संचालन नाना बोरले व आभार प्रदर्शन अतुल कऱ्हाळे यांनी केले.

# स्टेट बँकेत कोणताही व्यवहार न करता खात्यातून 92 हजार गायब

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**मलकापुर :** शहरातील शास्त्री नगर परीसरातील नंदा राजू उज्जैनकार - आशा वर्कर म्हणून काम करतात सदर महिला आपल्या मुलीचे अकाउंट उघडण्याकरता दि. १३ ऑगस्ट २६ रोजी भारतीय स्टेट बँकेत गेली होती.

त्यावेळी आपले खात्याचे पासबुक घेऊन त्यात तिने एन्ट्री केल्या. रक्कम बरोबर दिसून आली. मुलीचे खाते उघडणे सुरू असल्यामुळे सदर महिला ही बँकेत निवांत बसली. त्याचवेळी तिला मोबाईलवर अपडेट चा मेसेज आला. व लगेचच मोबाईल पुर्ण डेड झाला. काही काळानंतर सुरू केले असता त्यातील डाटा संपूर्ण डिलीट झालेला आढळला. त्यानंतर दि. १७ ऑगस्ट २६ रोजी हीच नंदाबाई बँकेत पैसे भरण्याकरता गेली असता पासबुक भरताना तिला आपली संपूर्ण रक्कम ₹ ९२०००/- गायब झाल्याचे आढळले. तिने बँकेतील मॅनेजरची याबाबत संपर्क केला असता. त्यांनी सायबर शाखा पोलीस स्टेशन येथे संपर्क करण्याचे सांगितले. दर महिला बुलढाणा येथील सायबर मध्ये आपली तक्रार नोंदवून आली आहे. तिच्या खाते उताऱ्यामध्ये ही रक्कम दुसऱ्या खात्यात वळती झाल्याचे आढळते. तिने याबाबत समोरील महिलेची संपर्क साधला असता ती महिला काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. पोलीस स्टेशन सायबर खात्याला याबाबत संपूर्ण माहिती दिली परंतु अद्यापही महिलेला तिची रक्कम परत मिळाली नाही. नंदाबाईच्या मुलीचे फी भरण्याकरता तिने सदर रक्कम खात्यात जमा केली होती. नंदाबाईच्या म्हणण्यानुसार तिला कोणताही ओ.टी.पी आला नव्हता. तिच्याशी कोणीही फोन द्वारे सुद्धा संपर्क साधला नाही. तिने बँकेत जाऊन कोणताही व्यवहार केला नाही. तरी पैसे गायब होणे हे गांभीर्याने विचार करण्याची बाब आहे.

# लायन्स क्लब खामगाव संस्कृतीकडून गरजू व्यक्तींना 12 रेनकोट्सचे वाटप

## सेवा आणि करुणेचे उत्तम उदाहरण — ४० लायन्स सदस्यांचा उत्साही सहभाग

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** समाजसेवा आणि गरजूंच्या मदतीच्या उद्देशाने, लायन्स क्लब खामगाव संस्कृतीच्या वतीने खामगाव येथील घाटपुरी परिसरातील 'गौरक्षण संस्था' येथे गरजू व्यक्तिंना १२ रेनकोट्सचे वाटप करण्यात आले. पावसाळ्यात गरजू व्यक्तींना दिलासा आणि संरक्षण मिळावे या उद्देशाने आयोजित केलेल्या या सेवा उपक्रमात सुमारे ४० लायन्स सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सदस्यांचा सक्रिय सहभाग आणि सेवाभावामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी आणि अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमास माननीय सागर फंडकर, नगर परिषद मुख्याधिकारी श्री. प्रशांत शेळके आणि माननीय श्री. शेखर पुरोहित यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली आणि उपस्थित सर्व सदस्यांचा उत्साह द्विगुणित झाला. या सेवा उपक्रमासाठी आवश्यक असलेले १२ रेनकोट्स रूछ्स्न रुठ्ठ. शशिकांत सुरेका यांनी सढळ हाताने उपलब्ध करून दिले. त्यांच्या या सहकार्याबद्दल आणि सेवाभावाबद्दल लायन्स क्लब खामगाव संस्कृतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी नमूद केले की, गरजू व्यक्तीला दिलेला रेनकोट हे केवळ पावसापासून संरक्षणाचे साधन नसून ते माणुसकी, करुणा, आदर आणि आपुलकीचे प्रतीक आहे. समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचणे हीच खऱ्या अर्थाने सेवाभावना आहे. लायन्स क्लब खामगाव संस्कृती विविध सामाजिक आणि पर्यावरणीय सेवा उपक्रमांद्वारे गरजूंची मदत करण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. या उपक्रमातही क्लबचे ब्रीदवाक्य "एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक" प्रत्यक्षात दिसून आले. यावेळी एमजेएफ लॉ.शशिकांत सुरेका यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. यावेळी क्लबचे अध्यक्ष एमजेएफ लॉ. नरेश चोपडा, सचिव लॉ. दिव्या अग्रवाल, खजिनदार लॉ. डिंपल वीरेंद्र शाह यांची उपस्थिती होती. लायन्स क्लब खामगाव संस्कृतीचा हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला असून, त्यातून सेवाभाव, करुणा आणि माणुसकीची भावना अधिक दृढ झाली आहे.

# पतीने मारहाण केल्याने; पत्नीची पोलीस स्टेशनमध्ये तक्रार

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**मलकापुर :** पतीच्या मोबाईलमध्ये दुसऱ्या महिलेचा कॉल पाहिल्यावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीला शिवीगाळ करत बेल्टने बेदम मारहाण केल्याची घटना मलकापुर शहरातील सिद्धिविनायक नगर, विद्या विकास शाळेजवळ परिसरात घडली. याप्रकरणी पत्नीच्या तक्रारीवरून मलकापुर शहर पोलिसांनी पतीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धिविनायक नगर, विद्या विकास शाळेजवळ भागातील रहिवासी माधुरी ईश्वर मेसरे (वय ३२) यांचे पती ईश्वर अशोक मेसरे हे १९ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास जेवणासाठी घरी आले होते. त्यावेळी माधुरी यांनी पतीचा मोबाईल घेतला असता, मोबाईलमध्ये एका महिलेशी संवाद साधल्याचे दिसून आले. यावरून पती-पत्नीमध्ये शाब्दिक वाद झाला. या वादातून संतापलेल्या ईश्वर मेसरे याने पत्नीला शिवीगाळ व लोटपाट करत चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्याने बेडवर पडलेला कमरेचा बेल्ट उचलून पत्नीच्या दोन्ही हातावर, पाठीवर व पायावर बेल्टने मारहाण करून जीवाने मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर पत्नीने पोलीस ठाण्यात धाव घेऊन आपबिती सांगितली. त्यांच्या फिर्यादीवरून मलकापुर शहर पोलिसांनी आरोपी पती ईश्वर मेसरे याच्याविरुद्ध अप.नं. ६११/२०२६ कलम ११८ (१), ११५(२),३५२,३५१(२), बीएनएसएस अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ अमोल शैले करीत आहेत.

# पालखीच्या गर्दीत दोन महिलांचे सोन्याचे दागिने लंपास

## मानवधर्मजवळ घटना; 19 हजार रुपयांचा ऐवज चोरीला

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** शेगावकडे पायी जाणाऱ्या भाविकांच्या गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी मानवधर्मजवळ दोन महिलांच्या गळ्यातील १९ हजार रुपयांचा सोन्याचा ऐवज लंपास केल्याची घटना बुधवारी समोर आली. खामगाव शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेगाव येथील रेणुका नगर क्रमांक २ मधील वैशाली गजानन शेळके (३७) या आशा सेविका असून, त्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन खामगावहून शेगावकडे पायी जात होत्या. १९ ऑगस्ट रोजी मानवधर्मजवळून जात असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ३ ग्रॅम वजनाचे जुने वापरते सोन्याचे राजा-राणी मंगळसूत्र चोरी केल्याची तक्रार दाखल केली आहे.याच गर्दीत गीता महेश परदेशी (४०, रा. सिव्हिल लाइन, राम मंदिराजवळ, खामगाव) यांच्या गळ्यातील २८ मणी व दोन डोरले असलेली सुमारे ६ ग्रॅम वजनाची जुनी वापरती सोन्याची पोथही चोरीला गेली.

दोन्ही महिलांच्या गळ्यातील दागिने चोरीला गेल्याने एकूण १९ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी वैशाली शेळके यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

# दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याची पोत लंपास

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** बसमध्ये चढण्याच्या लगबगीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याची पोत लंपास केल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी खामगाव बसस्थानकात घडली. अवघ्या काही मिनिटांत दोन्ही महिलांचे दागिने चोरीला गेल्याने बसस्थानकातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकारात तब्बल २५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीस गेले आहेत. बेबीबाई गजानन सुळोकार (५३, रा. पिंप्री गवळी, ता. खामगाव) बुधवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास बसमध्ये चढत होत्या. गर्दीमध्ये अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दोन डोरले व ३६ मणी असलेली सुमारे सहा ग्रॅम वजनाची सोन्याची पोथी हिसकावून नेली. या दागिन्यांची किंमत अंदाजे १० हजार रुपये आहे. त्याचवेळी नांद्री येथील छायाबाई दयालसिंग इंगळे (५०) यादेखील बसमध्ये चढत असताना चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दोन डोरले व १३ मणी असलेली सुमारे पाच ग्रॅम वजनाची सोन्याची पोथी लंपास केली. या दागिन्यांची किंमत अंदाजे १५ हजार आहे.

# खरीप पीक स्पर्धेसाठी अर्जाची संधी; शेवटचे 10 दिवस

## तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर रोख बक्षिसे

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** शेतकऱ्यांमध्ये पीक उत्पादकता वाढविण्याची स्पर्धात्मक भावना निर्माण करून उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने राज्यस्तरीय खरीप पीक स्पर्धा हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असतो. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आता केवळ १० दिवस शिल्लक असून, इच्छुक शेतकऱ्यांनी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. खरीप हंगामातील भात, ज्वारी,बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या पिकांचा स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरांवर घेण्यात येणार आहे. प्रत्येक स्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या शेतकऱ्यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुकास्तरावर क्रमांकासाठी ५ हजार, द्वितीय क्रमांकासाठी ३ हजार आणि तृतीय क्रमांकासाठी २ हजार रुपये बक्षीस देण्यात येईल. जिल्हास्तरावर अनुक्रमे १० हजार, ७हजार आणि ५ हजार रुपये, तर राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५० हजार, द्वितीय ४० हजार आणि तृतीय ३० हजार रुपयांचे बक्षीस आहे. प्रथम

**'पीक स्पर्धा नोंदणी' टॅबवरून अर्ज**

इच्छुक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर जाऊन 'पीक स्पर्धा नोंदणी' या टॅबवरून ऑनलाइन अर्ज करावा. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# मद्यपी पतीचा धुमाकूळ, सासू जखमी; गुन्हा दाखल

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** बाळापूर फैल परिसरात एका पतीने दारूच्या नशेत पत्नीला मारहाण केल्यानंतर सासूला लोखंडी सळईने प्रहार करून जखमी केले. १९ ऑगस्टच्या रात्री एक वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेनंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. तक्रारीनुसार, आरोपी दारूच्या नशेत घरी आला. त्याने पत्नीला चोरीच्या कारणावरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर मारहाण केली. पत्नीला होत असलेली मारहाण पाहून तिची आई आरोपीला समजावण्यासाठी मध्ये आली; मात्र संतापलेल्या आरोपीने हातातील लोखंडी सळईने तिच्या डोक्यात प्रहार केला. या हल्ल्यात ती जखमी झाली. घटनेनंतर जखमी महिलेवर वैद्यकीय उपचार करण्यात आले. त्यानंतर रेशमा शेख यांनी खामगाव शहर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली. तक्रार व वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# कॉलेज ऑफ मॅनेजमेंट मध्ये स्वतंत्र दिन मोठ्या उत्साहात साजरा

## आजची युवा पीढ़ीच करू शकते कॉलेज चे प्राचार्य डॉ डी.एस. रामटेके यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव:** १५ ऑगस्ट स्वतंत्र दिनानिमित्त लक्ष्मीनारायण गृप कॉलेज ऑफ मॅनेजमेंट च्या वतीने प्राचार्य डॉ. डी. एस. रामटेके सर यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी श्री कृष्णा रायपुरे शीतल रायपुरे ढ्ढञ्ज्ञढ्ढ चे प्राचार्य प्रथमेश डाबेराव, प्रा. लक्ष्मीकांत गावंडे प्रमुख पाहुने व्यासपीठा वर उपस्थित होते.

सामुहिक राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी. एस्सी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी सृष्टी मोरे आणि मो. मुशाफ्फा रजा यांनी केले. यावेळी बी.एस्सी. प्रथम वर्षाचे विद्यार्थी ध्रुव गायकवाड आणि सय्यद समीर यांनी देशभक्तीपर भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी सादिया फिर्दौस हिने देशभक्तीपर गीत सादर करून कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. रामटेके यांनी विद्यार्थ्यांना शिस्त,स्वच्छता तसेच प्रत्येक व्यक्तीचा आदर व सन्मान करण्याचे महत्त्व सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना चांगले नागरिक बनून समाज आणि देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. ढ्ढञ्ज्ञढ्ढ चे प्राचार्य प्रथमेश डाबेराव यांनी आपल्या भाषनातुन विद्यार्थाना प्रगति च्या पथावर नेण्याची गरच आहे आपल्या राष्ट्राची प्रगति आजची युवा पीढीच करू शकते असे मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ.राजकुमारी तेजेंद्रसिंग चौहान, उपप्राचार्य कोमल मेहरा, मॉडेल स्कूल चे मुख्याध्यापक सुदाम जाधव, निलेश महाजन, शिवप्रसाद चव्हाण, प्रा. पुष्पा जावरे, प्रा. वैशाली पुदागे, प्रा.अंकित मुळे प्रा. संकेत मार्के प्रा. मयूर इंगोले प्रा. वसिम खान, यांच्या सह प्रा. प्रीटी कुटे, प्रा. दीपाली वानखेड़े, प्रा. सनी कोकरे,शिक्षकेत्तर कर्मचारी आकाश खंडेराव मंगला बोराडे, खुशाली जोशी, नंदुसिंग चव्हाण स्वप्रील शिंदे, विशाल तराळे, रुपाली खंडागळे, पल्लवी इंगळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी फार्मसी विभागाचे ।।ह्रष्ठ श्री. अंकित मुळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गो. से. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मत्स्य बीज उत्पादन केंद्र कोराडी व लोणार अभयारण्य येथे शैक्षणिक सहल

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**खामगाव :** गो. से. महाविद्यालय, खामगांव येथील प्राणिशास्त्र विभागाच्या बी. एस्सी. (ए.इ.पी.,प्रणिशास्त्र मेजर व मायनर ) च्या विद्यार्थ्यांनी दिनांक ७ ऑगस्ट २०२६ रोजी जग प्रसिद्ध लोणार सरोवर व अभयारण्यास भेट देऊन तेथील जैवविविधता व पर्यावरण परीसंस्थेची माहिती जाणून घेतली. त्याकरिता विभागातील सुमारे ४५ विद्यार्थी - विद्यार्थिनी तर ४ शिक्षक -शिक्षिका सामील झाले होते. तत्पूर्वी विदयार्थ्यांनी कोराडी ता. मेहकर, जि. बुलडाणा येथील च्शासकीय मत्स्य बीज उत्पादन व विक्री केंद्रज् येथे भेट दिली. याप्रसंगी श्री विक्रम कच्छवे ,सहाय्यक आ यु क्त , म त्स्य व्य व सा य , बुलढाणा;केंद्राचे मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी, श्री उत्कर्ष



चांचरकर; मत्स्य क्षेत्रीक शेख उस्मान , विनोद शेळके यांनी विद्यार्थ्यांना मत्स्य उत्पादन , तळ्याचे विविध प्रकार, स्ट्रीमलाईन रेनफॉल,ब्रीडिंग पॉड्स , इनक्यूबेशन पॉड्स, हाचिंग पॉड्स,नर्सिंग व रिअरिंग पॉड्स, ऑक्सिजनेशन व ट्रान्सपोर्टेशन,कृत्रिम तळ्यांची डिसाइन व बांधकाम, विविध नैसर्गीक फर्टिलायझर, हॅचिन्ग हप्पा, चायनीज हॅचरी, इंड्यूस्ड ब्रीडिंग, हायपोफायशेशन व मत्स्य व्यवसाय विकासाकरीता लागणारी आधुनिक औषध प्रणाली इ. ची विस्तृतपणे माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना गोड्या पाण्यामध्ये मत्स्यउत्पादनासोबत विविध घटक जसे पॉलीकल्चर, एकात्मिक मत्स्य व्यवसाय, पेन संवर्धन तसेच मत्स्य व्यवसायातून मिळणारी विविध नैसर्गिक औषधे, तेल, फिश मॅन्युअर, फिश लेदर ची सुद्धा बहुपयोगी माहिती दिली. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. बी. काळे यांनी सांगितले कि,मासा हा एक आहारातील प्रमुख घटक आहे. माशांच्या प्रक्रियायुक्त पदार्थांना खूप मागणी आहे. समुद्रातल्या मासळी पेक्षा गोड्या पाण्यातल्या मासळीला चव असते. आरोग्याच्या दृष्टीने ते चांगलं आहे. त्यामुळे या गोड्या पाण्यातला मत्स्यशेतीकडं वळलं पाहिजे.खेड्याखेड्यांत पाझर तलाव, गावतळी, सामुदायिक शेततळी, वैयक्तिक विहिरी, नदीनाल्याचे डोहं, पात्र, लहान – मोठे जलाशय दगडाच्या खाणी – भातशेती इ. ठिकाणच्या पाण्यात माशांची शास्त्रोक्त पद्धतीनं पैदास करता येते. अनेक जण ही शेती सुरु करून चांगले पैसे मिळवतायत. उपलब्ध पाणीसाठ्यात योग्य जातीचे मासे योग्य प्रमाणात सोडून त्यांची जलद वाढ होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करून कमी वेळात जास्त माशाची पैदास पैदास करून शेतीला एक जोड व्यवसाय म्हणून मत्स्यव्यवसाय स्वीकारला गेला पाहिजे. कोराडी येथे गेल्या २५ वर्षापासून सातत्याने आम्ही ह्या केंद्राला भेट देतआहोत .उत्कृष्ट व्यवस्थापन, कर्तव्यदक्षता, व्यवसायाभिमुखता इ. कारणांमुळे हे केंद्र जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचे मत्स्यबीज उत्पादन व विक्री केंद्र ठरले आहे.शेतकऱ्यांना मत्स्य व्यवसाय करीता लागणाऱ्या गोड्या पाण्यातील माश्याची रोहू, कटला, म्रिगल, सिप्रिनस या माशांचे केंद्राकडून अल्प दरात वितरण होते.

# महावॉकेथॉन'मध्ये चालले हजारो अकोलेकर!

## माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवाचा संदेश





प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अकोला** : जल व मृदसंधारणासाठी लोकसहभाग वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे माती आणि पाण्याची बचत, संवर्धन करण्यासाठी मृद व जलसंधारणतर्फे विविध उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील पिढ्यांसाठी सुपीक जमीन आणि पाण्याची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने जलसंधारणाच्या कामात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

मृद व जलसंधारण विभागातर्फे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन साजरा करण्यात येत आहे. या दिनाचे औचित्य साधून आयोजित 'महा वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर' ला अकोला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आ. वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महेश परंडेकर, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल मस्कर, जलसंधारण अधिकारी सचिन वानरे, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी श्रीनिधी वाजपेयी, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून महा वॉकेथॉनला सुरुवात करण्यात आली. महा वॉकेथॉनमध्ये विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थी, उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थी, संस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

### रूपेश गुम्मेने पटकावला प्रथम क्रमांक

विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थी, उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, माय भारत, नेहरू युवा केंद्र, होमगार्ड, विविध क्रीडा संस्था, व्यायामशाळा, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपक्रमात प्रथम क्रमांक रूपेश गुम्मे व द्वितीय क्रमांक मनोज गोटे यांनी पटकावला.

# यंदा 28 ऑगस्टला साजरे करा रक्षाबंधन

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अकोला:** भावा-बहिणीच्या अतूट प्रेमाचे आणि पवित्र नात्याचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाची सर्वत्र लगबग सुरू झाली आहे. मात्र, यंदा रक्षाबंधन २७ की २८ ऑगस्टला, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. श्रावण पौर्णिमेला साजरा होणाऱ्या या सणाबाबत पंचांगातील तिथी आणि धार्मिक शास्त्रानुसार २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे करणे योग्य असल्याचे ज्योतिष अभ्यासकांनी सांगितले.



### भावा-बहिणीच्या नात्याचा मंगल सोहळा

रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून भावा-बहिणीच्या प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच नात्याचा उत्सव आहे. बहीण भावाच्या दीर्घायुष्य, आरोग्य आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करते, तर आयुष्यभर बहिणीच्या संरक्षणाची आणि तिच्या सुख-दुःखात साथ देण्याची भावना भाऊ व्यक्त करतो धार्मिक विधीसोबतच या सणामागील भावनिक आणि कौटुंबिक मूल्यांनाही विशेष महत्व आहे.

### यावर्षी राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त

२८ ऑगस्ट, सकाळी ६.२३ ते ९.४८ उदय तिथीनुसार वेळ अत्यंत शुभ मानला गेला आहे याशिवाय दुपारी १२.०५ ते ०१.०५ या वेळेत असणारा मुहूर्तही राखीसाठी सर्वोत्तम आहे. २८ ऑगस्टला सूर्योदयाच्या वेळी पौर्णिमा असल्याने रक्षाबंधन याच दिवशी साजरे करने योग्य असल्याचे पंचांगकत्यांचे मत आहे.

### भद्राकाळामुळे २७ ऑगस्ट टाळावे रक्षाबंधन

यंदा २७ ऑगस्टला पौर्णिमा तिथी सुरू होत असली तरी भद्राकाळामुळे या दिवशी राखी बांधणे टाळावे, अशी धार्मिक मान्यता आहे. हिंदू धर्मशास्त्रात भद्रा काळात शुभ कार्ये करण्यास मनाई केली जाते. त्यामुळे २७ ऑगस्टऐवजी २८ ऑगस्ट रोजी राखी बांधणे धार्मिकदृष्ट्या अधिक शुभ मानले जात आहे.

### उदय तिथीला विशेष महत्त्व

हिंदू धर्मात सण उत्सवांच्या तारखा निश्चित करताना उदय तिथीला विशेष महत्त्व आहे. यंदा श्रावण शुक्ल पौर्णिमा २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०८ वाजता सुरू होऊन २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९.४८ वाजता समाप्त होत आहे. त्यामुळे २८ ऑगस्टला सुर्योदयाच्या वेळी पौर्णिमा तिथी असल्याने उदय तिथीनुसार याच दिवशी रक्षाबंधन साजरे करणे शाखसंमत असल्याचे पंचांगकर्त्यांचे मत आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी सकाळी ६.२३ ते ९.४८ वाजेपर्यंत राखी बांधण्यासाठी शुभमुहूर्त असल्याचे सांगण्यात आले आहे. या मर्यादित कालावधीत बहिणींनी भावाला राखी बांधून औक्षण करावे, असे सांगितले. बाजारपेठेत राखी पौर्णिमेसाठी दुकाने सजली असून खरेदीसाठी महिलांची लगबग वाढली आहे.

# नाईक होमिओपॅथी तर्फे विश्व मांगल्य सभा कावड कलश यात्रेत भेट वस्तू वितरीत



प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अकोला:**स्थानिक मोठे राममंदिर येथे आयोजित अखिल भारतीय विश्व मांगल्य सभा कावड-कलश यात्रेत नाईक होमिओपॅथी तर्फे भेट वस्तू देवून महिला प्रती जागृतीचा परिचय देण्यात आला. भेटवस्तू मध्ये पाणी बॉटल, उपवासाचे चिफस् आणि महिलांना वयोगटा नुसार होणारे अपाय आणि टाळण्यासाठी उपाययोजना याचे सचित्र पत्रक देण्यात आले. नगरसेवक निलेश देव आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पत्रक निरखून पाहिले आणि ही खरी महिला जागृती आहे असे आवर्जून सांगितले. नाईक होमिओपॅथी कडून सौ. अर्चना नाईक यांचे या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले. निलेश देव, राम मंदिराचे व्यवस्थापक विजय अग्रवाल, सौ. अर्चना नाईक आणि विश्व मांगल्य सभेचे पदाधिकारी यांच्या हस्ते आलेल्या सर्व भाविक महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या.

# गोवा विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात ललितलेख संग्रहाचा समावेश

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**मूर्तिजापूर:** येथील कवी व ललित लेखक रवींद्र जवादे यांच्या'गाई गेल्या राना' या ललित लेखसंग्रहाचा सन २०२६-२७ पासून सुरू होणाऱ्या पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रमातील MAR-6004- 'ग्रामीण मराठी साहित्य:स्वरूप व संशोधन' या पेपर अंतर्गत समावेश करण्यात आला आहे.याबाबत त्यांना गोवा विद्यापीठाचे पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे.

ग्रामीण जीवनातील स्पंदने नेमकेपणाने टिपणारा हा ललित लेखसंग्रह, विदयार्थ्यांना ग्रामीण जीवनाचा अधीक जवळून अभ्यास करताना,यातील लालित्याच्या आनंदाची एक वेगळी अनुभूती देईल,असा



विश्वास विदयापीठाने व्यक्त केला आहे.

'गाई गेल्या राना' या ललित लेख संग्रहात विस ललित लेख असून,या संग्रहाला महाराष्ट्रातील नामवंत संस्थांचे नऊ पुरस्कार मिळालेले आहेत.प्रतिष्ठित दिवाळी अंक व पुरवण्यांमधुन संग्रहातील लेख प्रकाशित झालेले आहेत.तसेच रवींद्र जवादे यांची विविध साहित्य प्रकारातील तेरा पुस्तके प्रकाशित असून,विविध पुस्तकांना पुरस्कार मिळालेले आहेत.त्यांनी चित्रपट कथा, शार्टफिल्म कथाही लिहीलेल्या आहेत.

# पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अकोला:** यंदाच्या पावसाळ्यात पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. काही भागात पाऊस झाला असला तरी तो सातत्याने न झाल्याने अनेक ठिकाणी स्थिती गंभीर झाली आहे. पावसाच्या खंडामुळे जमिनीतील ओलावा कमी होत असून, सोयाबीन, कापूस यासह खरीप पिकांना आता चांगल्या पावसाची गरज आहे. पिकांवर मोठा खर्च केल्यानंतर शेतकरी आता आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. त्यामुळे पुढील काळात दमदार पाऊस होणार का, आणि खरीप हंगामाला त्याचा कितपत फायदा मिळणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पावसाचा खंड पिकांसाठी धोकादायक ठरतो आहे.

# शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या 2,421 पदांसाठी मेगाभरती

प्रतिनिधी २१ ऑगस्ट

**अमरावती** : महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. 'पवित्र' पोर्टलद्वारे वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशी एकूण २ हजार ४२१ रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. या भरतीमुळे राज्यातील पात्र उमेदवारांना शिक्षक सेवेत प्रवेशाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. अशी माहिती नाशिक येथील आदिवासी विकास लीना बनसोड यांनी दिली.आदिवासी विकास विभागाच्या नाशिक,



ठाणे, अमरावती आणि नागपूर या चारही विभागांतील शासकीय आश्रमशाळांमधील पदांचा या भरतीमध्ये समावेश आहे. नाशिक विभागात ८२६, ठाणे विभागात ६१३, नागपूर विभागात ५१४ आणि अमरावती विभागात ४६८ पदे भरण्यात येणार आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम), माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) तसेच उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) या पदांचा समावेश आहे.

# अकोला लिनेस क्लब तर्फे प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख आणि क्षेत्रीय संयोजिका ममता सूर्या यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न!

प्रतिनिधी २१ ऑगस्ट





**अकोला:** अकोला लिनेस क्लबच्या वतीने प्रांताध्यक्षा लि. कल्पना देशमुख आणि क्षेत्रीय संयोजीका लि. ममता सूर्या यांच्या अधिकृत भेट कार्यक्रमाचे ११ ऑगस्ट रोजी सेंटर प्लाझा येथे अत्यंत गरिमामय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. भेट कार्यक्रमाच्या दोन दिवस आधी, ९ ऑगस्ट रोजी एकादशीचे औचित्य साधून गोरक्षण संस्थेत लि. सुलेखा गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली, क्लब अध्यक्षा राजेश्री समणपुरे व लि. रत्नमाला रूईकर यांच्या सहकार्याने प्रांताध्यक्षा लि. कल्पना देशमुख यांचा तुलादान कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. तसेच १० ऑगस्ट रोजी लि. डॉ. अनिता सोमाणी यांच्या सहकार्याने लिनेस सख्यांच्या उपस्थितीत एका गरजू महिलेला सायकल प्रदान करण्यात आली.

११ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीची गरिमा जपत प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख व प्रादेशिक संयोजक ममता सूर्या यांचे 'अतिथि देवो भव' या भावनेतून पदप्रक्षालन, टिळा, आरती, माल्यार्पण आणि मुखगोड करून भावूक स्वागत करण्यात आले. यानंतर प्रांत सचिव रिंकू खंडेलवाल आणि प्रांत कोषाध्यक्ष शीतल अग्रवाल यांचे स्वागत झाले. तसेच वाईस मल्टीपल प्रोसिडेंट ऊषा बाहेती, पीडीपी हरविंदर कौर सेठी,पीडीपी आशा विरवानी,पीडीपी डॉ. तारा माहेश्वरी,पीडीपी सुनंदा गुप्ता, आणि पीडीपी स्वाती झुंझुनवाला या सर्व अतिथींचा टिळालावून, तिरंगा पट्टा घालून सन्मान करण्यात आला. तसेच देशभक्तीपर गीत-नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये लि. अंकिता गुप्ता आणि लि. मोना पारेख यांना सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षांच्या सत्कारांतर्गत लि. अरुंधती शिरसाट, लि. डॉ. तारा माहेश्वरी, लि. शशी मुरारका आणि लि. नम्रता अग्रवाल यांचा सत्कार करण्यात आला. या भव्य सोहळ्याचे आयोजन लि. रत्नमाला रूईकर, लि. राजश्री देशमुख, लि. दिव्या देशमुख, लि. इंद्राणी देशमुख, अरुंधती शिरसाट आणि लि. दिना शाह यांनी केले होते. आयोजकांतर्फे ठेवण्यात आलेल्या सरप्राईज स्पर्धेत रुपल लोटिया, आशा मोटवानी, राधा सराफ, अंकिता गुप्ता आणि शीतल अग्रवाल या ५ विजेत्यांना सौभाग्यवर्धक भेटवस्तू देण्यात आल्या.कार्यक्रमप्रसंगी सदस्यांचा वाढदिवस व लग्नाचा वाढदिवस साजरा करून भेटवस्तू देण्यात आल्या.

सेक्रेटरी वनिता बिजवे यांनी जानेवारी ते जुलै या कालावधीचा सेक्रेटरी रिपोर्ट सादर केला. कोषाध्यक्ष अलका उमाळे यांनी जानेवारी ते जुलै या कालावधीचा आर्थिक जमा-खर्च मांडला व निधी संकलनासाठी विविध उपक्रम राबवणार असल्याचे स्पष्ट केले. शेवटी सेक्रेटरी वनिता बिजवे यांनी सर्व अतिथींना आपुलकीने आणि आदराने अन्नपूर्णेची थाळी ग्रहण करण्यासाठी आमंत्रित केले व मान्यवरांना भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

### विविध सामाजिक व सेवा उपक्रम

या भेटीदरम्यान क्लबतर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात आले:

**दिव्यांग मुलीला ट्रायसायकल:** प्रायोजक लि. आशा विरवानी, लि. सुमित्रा खेतान व लि. इंदुमती मोहता यांच्या सहकार्याने एक ट्रायसायकल प्रदान करण्यात आली.

**स्वावलंबन स्टॉल:** दिव्यांग फाउंडेशनचे संचालक डॉ. कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग महिलेने स्वतः तयार केलेल्या छत्र्या, राख्या, अगरबत्ती, साबण आणि शोभेच्या वस्तूंचा स्टॉल लावून रोजगारास प्रोत्साहन देण्यात आले.

**कर्णबधिर विद्यार्थ्यांना मदत:** लि. इंदू तिवारी यांनी २ कर्णबधिर विद्यार्थ्यांना हिअरिंग मशीनच्या सेलसाठी ४,८०० रुपयांची मदत दिली.

**'आईपेक्षा मुलगी सवाई' व विशेष सन्मान**

एएलसीआय फाऊंडर प्रेसिडेंट आणि चेअरपर्सन डॉ. मंजिरी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनानुसार 'आईपेक्षा मुलगी सवाई' या उपक्रमांतर्गत दोन मुलींचा सन्मान करण्यात आला:

१. रोबोटिक्स व टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या संचालिका काजल प्रकाश राजवैद्य.

२. नॅशनल लेव्हल बॉक्सिंग चॅम्पियन (सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक विजेती) भक्ती रवींद्रसिंह चुनगडे.



### महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे अलौकिक दर्शन

महाराष्ट्रातील सण व संस्कृतीचे प्रतीक म्हणून प्रांताध्यक्षा लि. कल्पना देशमुख व लि. ममता सूर्या यांना खालील भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. गुढीपाडवा: आकर्षक गुढी,रामनवमी: सुंठवडा, रामरक्षा,वटपौर्णिमा: आंबा व गव्हाची ओटी,आषाढी वारी: तुळशीची माळ व तुळशीचे रोप,राखी पौर्णिमा: देवराखी,गणेशोत्सव: दुर्वा, फुले व गुळाचा मोदक,नवरात्र: आपट्याची पाने, ओढणी व वेणी, शिवजयंती: भगवा ध्वज,मकरसंक्रांत: तीळ-गुळ, पतंग व पर्स,दिवाळी: उटणे, दिवा व फटाके,होळी: गुलाल व पिचकारी यासह सर्व सणांवर आधारित नृत्याविष्कार सादर करून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवण्यात आले. कार्यक्रमाची सांगता 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने झाली. या नृत्याचे सादरीकरण, आयोजक तसेच राधा सराफ, सीमा सावजी, अर्चना पातुरकर, मंजूषा देशमुख आणि चंदा जायसवाल यांनी केले.

### औपचारिक सभा व विविध संकल्प

त्यानंतर औपचारिक बैठकीस प्रारंभ झाला. अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. गीता रुपारेलिया यांनी ध्वजवंदना केली तर चंदा जायसवाल यांनी स्वागतगीत सादर केले. अध्यक्षीय भाषणात अध्यक्षा राजेश्री समणपुरे (जायसवाल) यांनी आगामी प्रकल्पांची माहिती देताना, क्लबतर्फे मोफत डोळे तपासणी शिबीर आणि ११ मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा संकल्प जाहीर केला. सेक्रेटरी वनिता बिजवे यांनी अहवाल वाचन केले. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देत गेल्या ४ महिन्यांच्या परंपरेनुसार प्रांताध्यक्षा लि. कल्पना देशमुख, प्रादेशिक संयोजक लि. ममता सूर्या, रिंकू खंडेलवाल आणि शीतल अग्रवाल यांना पुष्पगुच्छ, रोपे आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. प्रांताध्यक्षांचा परिचय लि. रत्नमाला यांनी तर प्रादेशिक संयोजकांचा परिचय इंद्राणी देशमुख यांनी करून दिला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अकोला क्लबच्या कार्याचे कौतुक करताना प्रांताध्यक्षा कल्पना देशमुख अत्यंत भावूक झाल्या व 'हे अश्रू आनंदाचे आहेत' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. प्रादेशिक संयोजक ममता सूर्या यांनीही अकोला क्लबच्या रिपोर्टिंगचे आणि उत्कृष्ट कामाचे कौतुक केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135